दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

SAMARTH RAJYOG

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -३०३ | रविवार दि.१२ जुलै २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily | Marathi | Year-6th | Issue-303 | Sunday, Dt.12 July 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# अखेर आंबेजोगाई आगाराच्या निष्क्रिय आगारप्रमुख अमर राऊत यांची हकालपट्टी

## रा.प.म. प्रशासनाने दखल घेत आगारप्रमुखाला हाकलले तसे महसूल प्रशासन अशीच दखल घेत अंबाजोगाई तहसीलदाराना कधी हाकालणार....?

**अंबाजोगाई / सुनिल सिरसाट**

**अखेर रापम प्रशासनाने दै.समर्थ राजयोगच्या पाठपुराव्याची दखल घेत अंबाजोगाई आगाराचे आगारप्रमुख राऊत यांची हाकालपट्टी केली.गेल्या एका दशकापेक्षा जास्त काळापासून अंबाजोगाई आगारात विविध पदावर काम करत ठाण मांडून बसलेल्या निष्क्रिय अशा अमर राऊत यांच एकंदरीत ढसाळ नियोजन, कर्मचाऱ्यांसोबत सातत्याने मतभेद आणि कर्मचाऱ्यांना ड्युटी देताना भेदभाव करत काम करणाऱ्या आणि गाड्यांच्या दुरुस्त्या व फेऱ्या यामध्ये सातत्याने अपयशी ठरलेल्या अगदी निष्क्रिय अशा आगार प्रमुखाला जवळपास सर्वच कर्मचारी वैतागून गेले होते.**


एवढेच नाही तर कधीकाळी प्रत्येक गोष्टीमध्ये अगदी वरच्या क्रमांकावर असणारे आंबेजोगाई आगार आज सर्वच बाजूंनी रसातळाला गेल्याचे दिसून येत आहे. आणि मग अशातच अशा निष्क्रिय अधिकाऱ्याची निष्क्रियता या ना त्या माध्यमातून प्रकर्षाने दिसून-आढळून येत असल्याने आणि आगारातील विविध विभागातील विविध कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या-छापण्याच्या अटीवर दै.समर्थ राजयोग वरती पूर्णतः विश्वास टाकून आगर प्रमुख अमर राऊत यांचा बेजबाबदारपणा आणि त्यांचे एस.टी.सेवेकडे असणारे दुर्लक्ष सातत्याने दै.समर्थ राजयोगचे उपसंपादक सुनील सिरसाट यांच्या लक्षात आणून दिल्याने आणि आगारातील भोंगळ कारभार सर्वसामान्यांपर्यंत बातम्यांच्या माध्यमातून पोहोचू द्यावा अशी विनंती केल्याने उपसंपादक सुनील सिरसाट यांनी जवळपास एक-दीड महिना सातत्याने आगारातील ढसाळ कारभारावर बातम्यांच्या माध्यमातून प्रकाश टाकल्याने मराठवाडा विभागापासून मुंबई सेंट्रल ब्रँच पर्यंत एस.टी.च्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि विशेषतः परिवहन मंत्री मा.ना.प्रतापजी सरनाईक यांनी या बातम्यांची आवर्जून दखल घेत अखेर निष्क्रिय आगार प्रमुख अमर राऊत यांची बदलीच्या नावाखाली हकालपट्टी केली आहे. अशीच प्रतिक्रिया डेपोतील कर्मचाऱ्यांसह प्रवाशी म्हणून अंबाजोगाई आगारातील गाड्यांचा अनुभव घेतलेल्या प्रवाशांनी दिल्या.

आता अमर राऊत यांच्या जागेवर येणारे अधिकारी श्री.शिवराज कराड यांनी यापूर्वी आंबाजोगाई आगाराचा कारभार सांभाळलेला आहे.परंतु त्यांची बदली झाल्यावर ते जिल्ह्याच्या विभाग नियंत्रक कार्यालयात गेल्याने त्यांचा निश्चितच अनुभव वाढलेला आहे. नाहीतरी यापुर्वी त्यांचे कर्मचा-यांसोबत कमी, परंतु बाहेरच्यांसोबत छोटमोठे वाद झालेले आहेत. परंतु तेंव्हाचा काळ आणि वाढलेल्या अनुभवा नंतरचा काळ व त्यांच्या जिल्ह्यावरील अनुभवाचा आंबाजोगाई




आगाराला किती फायदा होतो. हे पाहणेही या ठिकाणी औस्तुक्याचे ठरेल..!

प्रशासनाने दै.समर्थ राजयोगच्या बातम्यांची आवर्जून दखल घेत आंबेजोगाई येथील एस.टी. महामंडळाचे आगारप्रमुख अमर राऊत यांची बदलीच्या नावाखाली हाकालपट्टी केली खरी. परंतु आगार प्रमुखांच्या बरोबरीनेच आंबेजोगाईच्या तहसीलदार विलास तरंगे यांच्या बाबतीत ही गेल्या वर्षा-दीड वर्षापासून चंद्रपूर येथील आदर्श मीडिया असोसिएशनच्या राज्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांनी निरनिराळ्या प्रकरणांच्या माध्यमातून तहसीलदार विलास तरंगे यांच्या विरोधात



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
सनियंत्रण समिती क्र.०२ आस्थापना आदेश क्र. २८ /२०२६
संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१५/२०२४
क्र.राप/आस्था-१/सेमं/१३२७ दि.११.०६.२०२४

विभागीय वाहतूक अधिक्षक [अप]/ आगार व्यवस्थापक [वा][क], या पदातील खालील अधिका-यांची सध्याच्या वेतनावर व वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोर नमूद ठिकाणी बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव व पद | सध्याचा विभाग | बदलीचा विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री रंजित बलदेव राजपूत, आगार व्यवस्थापक [वा][क] | रा.प.जाफ्राबाद आगार, जालना विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.छ.संभाजीनगर आगार क्र.२, छ.संभाजीनगर विभाग | प्रशासकीय बदली |
| २. | श्री.शिवराज हरिभाऊ कराड, विभागीय वाहतूक अधिक्षक [अप] | रा.प.बीड विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.अंबाजोगाई आगार, बीड विभाग | प्रशासकीय बदली |
| ३. | सौ.स्वाती अमरेंद्र बाखडे, विभागीय वाहतूक अधिक्षक [अप] | रा.प.छ.संभाजीनगर विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.छ.संभाजीनगर आगार क्र.१, छ.संभाजीनगर विभाग | प्रशासकीय बदली |
| ४. | श्री.योगेश बबनराव गिते, विभागीय वाहतूक अधिक्षक [अप] | रा.प.जालना विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.जाफ्राबाद आगार, जालना विभाग | प्रशासकीय बदली |
| ५. | श्री.अमर दिलीप राऊत, आगार व्यवस्थापक [वा][क] | रा.प.अंबाजोगाई आगार, बीड विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.पैठण आगार, छ.संभाजीनगर विभाग | प्रशासकीय बदली |
| ६. | श्री.अनिल राजेंद्र बिडवे, आगार व्यवस्थापक [वा][क] | रा.प.निलंगा आगार, लातूर विभाग | आगार व्यवस्थापक [वा][क], रा.प.परभणी आगार, परभणी विभाग | प्रशासकीय बदली |

वरील अधिकारी यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यात येत असल्याने त्यांना नियमानुसार प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, पद्ग्रहण अवधी इत्यादी अनुज्ञेय असल्यास देय राहील.

वरील अधिका-यास बदलीच्या ठिकाणी रुजु होण्याकरीता संबंधित विभाग प्रमुख/ घटक प्रमुख यांनी कार्यमुक्त करावे. सदर अधिका-यांनी बदली ठिकाणी हजर झाल्याचा अहवाल मा.महाव्यवस्थापक [क.व औ.सं.], यांचेकडे सादर करण्यात यावा व त्याची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

जाक्र./राप/निस-२/प्रशा/२०२६/ ११९६
सनियंत्रण समिती क्र.०२,
रा.प.छ.संभाजीनगर प्रदेश.
दि. ०३.०७.२०२६
०६.

(अनघा शै. बारटक्के)
प्रादेशिक व्यवस्थापक
सनियंत्रण समिती क्र.२,
रा.प.छ.संभाजीनगर प्रदेश

प्रत रवाना :
- मा.महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)/ मा.महाव्यवस्थापक (वाहतूक),रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.
- प्रादेशिक अभियंता, सनियंत्रण समिती क्र.२, छ.संभाजीनगर यांना माहितीस्तव.
- विभाग नियंत्रक, रा.प.छ.संभाजीनगर/जालना/बीड/ धाराशिव/परभणी/नांदेड/लातूर विभाग यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.

अनेक तक्रारी केल्या असून नुकतेच त्यांनी आंबेजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणही केले असून वेळप्रसंगी आत्मदहन करण्याचाही इशारा दिला होता. परंतु अंबाजोगाईचे कर्तव्यदक्ष उपजिल्हाधिकारी श्री.दिपक वजाळे आणि महसूल प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनी एक महिन्याचा कालावधी मागितल्याने, लेखी आश्वासन दिल्याने प्रिया झांबरे यांनी तुर्तास तरी उपोषण मागे घेतले असले, तरी आगार प्रमुखांची इतक्या तातडीने दखल घेत हकालपट्टी केलीय. तर आंबेजोगाईच्या निष्क्रिय आणि भ्रष्ट तहसीलदार विलास तरंगे यांची बदली रूपाने हाकालपट्टी कधी होणार..?

महसूल मंत्री या तहसीलदारालाही लवकरात लवकर हाकालणार का..? असा प्रश्न तक्रारदार प्रिया झांबरे आणि त्यांच्या सहकारी पदाधिका-यांनी आगार प्रमुखांच्या बदली अनुषंगाने बोलताना उपस्थित केला आहे. तेंव्हा खरंच रा.प.म. प्रशासनाप्रमाणे महसूल प्रशासनही धाडसी निर्णय घेईल का...?

याकडेच संपूर्ण अंबेजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्याचे लक्ष लागून आहे..!

## लोककलांच्या धोरणाच्या बळकटीकरणासाठी समिती स्थापन करणार

पद्मश्री रघुवीर खेडकरयांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाराष्ट्रातील विविध भागातील लोककलावंतानी पुण्यातील मोती बाग येथे मंत्री शेलार यांची भेट घेतली. या संवाद कार्यक्रमात रघुवीर खेडकर यांनी यावेळी शासनाकडे लोककलावंताच्या मागण्या मांडल्या. यावेळी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश अवलगावकर,समरसता गतीविधी अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य डॉ. रमेश पांडव आणि कलावंत उपस्थित होते.

यावेळी कलावंतांशी संवाद साधताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, आज डिजिटलचे युग असून जगभरातील दर्शकांना व पुढच्या पिढीला ज्ञात व्हाव्यात म्हणून लोककलांचे डिजिटल संग्रहालय, दस्तावेजीकरण, जतन आणि पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा उपक्रम आपण तातडीने सुरू करू. शासनाच्या विविध जनजागृती आणि प्रचार-प्रसार योजनांमध्ये स्थानिक लोककलावंतांना प्राधान्य दिले पाहिजे. पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, सामाजिक विकास किंवा शासनाच्या विविध योजनांचा प्रचार असो, या सर्व ठिकाणी लोककलावंतांना संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी आवश्यक शासन निर्णय तातडीने काढण्याची कार्यवाही आपण करू, असेही त्यांनी आश्वस्त केले.

## नगर-दौंड महामार्गावर भीषण अपघात दोन वाहने जाळून खाक



अहिल्यानगर । प्रतिनिधी

नगर - दौंड महामार्गावर खंडाळा शिवारात ११ जुलै रोजी पहाटे ५.४५ च्या सुमारास दोन मालट्रकची समोरासमोर धडक होवून भीषण अपघात झाला. अपघातानंतर दोन्ही ट्रक ने पेट घेतला. ही आग मोठ्या प्रमाणात भडकली. या आगीत दोन्ही मालट्रक व त्यामधील माल जळून खाक झाला असून लाखोंचे नुकसान झाले आहे. या अपघातात एक ट्रक चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

एक मालट्रक (क्र. एमएच १६ एई ०८६०) नगर एमआयडीसी मधील कंपनी मधून लोखंडी जॉब घेवून दौंड कडे चालला होता. तर दुसरा मालट्रक (क्र.एमएच १८ बीझेड ७३५२) कापडाचे गठ्ठे घेवून दौंड कडून नगर मार्गे धुळ्याकडे चालला होता. पहाटे ५.४५ च्या सुमारास दोन्ही मालट्रकची समोरासमोर धडक झाली. अपघाचा मोठा आवाज आल्यानंतर कार्ले कुटुंबीय व परिसरातील नागरिक मदतीसाठी धावले. नगरच्या मालट्रक चा चालक सोमनाथ नागरगोजे (रा. वडगाव, ता. पाथड) हा केबिनच्या काचा फोडून बाहेर पडला. तर धुळ्याकडे चाललेल्या ट्रक चालक संजय दावर (रा.शिरपूर, सेंदवा, मध्यप्रदेश) यास संदेश कार्ले व इतरांनी केबिन मधून बाहेर काढत तो गंभीर जखमी असल्याने स्वतःच्या गाडीतून उपचारासाठी नगरला पाठविले. अपघातानंतर काही वेळात एका ट्रकच्या इंधनाच्या टाकीचा स्फोट होवून दोन्ही वाहनांना मोठी आग लागली.

कार्ले यांनी तात्काळ अहिल्यानगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाला व पोलिसांना कळवले. मालट्रक मध्ये कापड असल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. तातडीने अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझविण्याचे प्रयत्न सुरु केले. कार्ले यांनी त्यांच्या शेतातील वीज पंप सुरु करून या गाड्यांना पाण्याचा पुरवठा केला. एक ते दीड तासांच्या परिश्रमांनंतर आग विझली. मात्र तो पर्यंत दोन्ही वाहने आणि त्यातील साहित्य जळून खाक झाले होते. नगर तालुका पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत अपघात ग्रस्त वाहने जेसीबीच्या सहाय्याने व कार्ले तसेच इतरांच्या मदतीने बाजूला करत वाहतूक सुरळीत केली

## भक्तिमय वातावरणात सुभाष रोडचे 'संत मुक्ताई मार्ग' नामकरण

### बीडच्या अध्यात्मिक परंपरेला नवे वैभव - आ. विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ मुक्ताई पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेने शहरातील सुभाष रोडचे 'संत मुक्ताई मार्ग' असे नामकरण केले. संत-महंत, वारकरी, लोकप्रतिनिधी, व्यापारी आणि नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

ह.भ.प. रविंद्र महाराज पाटील यांनी हा सोहळा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल, असे सांगितले. तर आ. विजयसिंह पंडित यांनी संत मुक्ताईंचे नाव देऊन बीडच्या अध्यात्मिक परंपरेचा सन्मान झाल्याचे सांगत गोविंदपंतांच्या समाधी परिसराच्या जिर्णोद्धाराचा संकल्पही व्यक्त केला.भक्तिमय वातावरणात संपन्न झालेला हा सोहळा बीडच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासातील महत्त्वाचा अध्याय ठरला.




यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री शिवाजीराव पंडित, श्रीक्षेत्र मुक्ताई संस्थानचे ह.भ.प. रविंद्र महाराज पाटील, आ. विजयसिंह पंडित, श्रीक्षेत्र नारायणगडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज, श्रीक्षेत्र भगवानगडाचे विश्वस्त अतुल शास्त्री, ह.भ. प. विशाल महाराज खोले, श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे ह. भ. प. नवनाथ महाराज, ह. भ. प.महंत अमृत दास महाराज जोशी, ह. भ. प. अखंड आनंद गिरी महाराज, ह भ प तुकाराम महाराज भारती, ह. भ. प.हरिदास जोगदंड, ह. भ. प. विनायक महाराज पाटणकर, ह. भ. प. नाना महाराज, कदम ह भ प हरणे महाराज ह. भ. प. पंकज महाराज पाटील यांची विशेष उपस्थिती होती. तसेच यावेळी पत्रकार संतोष मानूरकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बळीराम गवते यांच्यासह बीड नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, उपाध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुख पटेल, सभापती शेख निजाम, सभापती बाळासाहेब गुंजाळ, सभापती संजय उढाण,

सभापती रणजीत बनसोडे, सभापती जकी सौदागर, उपसभापती शेख बिलाल, नगरसेवक महेश धांडे, प्रमोद शिंदे, मनोज गोडसे, दत्ता जाधव, रामदास सरोदे, अशपाक इनामदार, सादेक अली, जयतुला खान भैय्यासाहेब मोरे, शेख खलील, शामराव पडुळे यांच्यासह विविध संत-महंत, बीड नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक, व्यापारी, वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी, शिवछत्र परिवाराचे कार्यकर्ते तसेच बीड शहरातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माधव चाटे यांनी केले



बीड - आदिशक्ती मुक्ताबाई पालखी सोहळ्याचे बीड शहरात आगमन झाले असता रामनगर या ठिकाणी शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी बीड जिल्ह्यातील वारकरी संप्रदायतील भाविक भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानधनाशिवाय निवडणूक कामाचा बोजा, सेतू केंद्र चालकांमध्ये नाराजी

### बीएलओ सहाय्यक म्हणून नियुक्ती, भत्ता व मानधनाची मागणी

बीड । प्रतिनिधी

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेसाठी बीड विधानसभा मतदारसंघातील सेतू सुविधा केंद्र चालकांची इडज सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, या कामासाठी मानधन, प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता नसल्याने चालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.निवडणुकीच्या अतिरिक्त कामामुळे सेतू केंद्रांचे नियमित काम बंद राहून आर्थिक नुकसान होत




असल्याचा दावा चालकांनी केला आहे. निवडणूक प्रक्रियेस सहकार्य करण्यास हरकत नसली तरी शासनाने मानधन व आवश्यक सुविधा द्याव्यात, अशी त्यांची मागणी आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व भारत निवडणूक आयोगाकडे निवेदन देण्याची तयारी सुरू असून, मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा सेतू केंद्र चालकांनी दिला आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



संपादकीय....

# लोकसंख्येबाबत जागरुकता महत्त्वाची

लोकसंख्या वाढ, प्रजनन, आरोग्य आणि शाश्वत विकास या मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दरवर्षी ११ जुलै रोजी 'जागतिक लोकसंख्या दिन' साजरा केला जातो. ११ जुलै, १९८७ रोजी जगाच्या लोकसंख्येने ५ अब्जाचा टप्पा पार केला, तेव्हा त्यावेळच्या 'फाईव्ह बिलियन डे' या घटनेने निर्माण केलेल्या जागतिक उत्सुकतेतून प्रेरणा घेऊन १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे जागतिक लोकसंख्या दिनाची सुरुवात करण्यात आली.

आज आपण ३९ व्या जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त वाढत्या लोकसंख्येसंबंधित गंभीर समस्यांबद्दल देशात जागरूकता निर्माण करण्यासाठी पथनाट्य, व्याख्याने, घोषवाक्य, निबंध स्पर्धा, पोस्टर्स लावणे व जनजागृतीसाठी रॅली काढणे अशा विविध कार्यक्रमांनी जनजागृती केली जाणार आहे. मुख्य उद्देश आहे की, देशातील वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे तसेच कुटुंब नियोजन आणि माता आरोग्याबाबत लोकांना शिक्षित करणे होय. त्यामुळे लोकसंख्येबाबत जागरूकता आजही महत्त्वाची आहे. आज लोकसंख्येच्या बाबतीत आपला देश जगात नंबर वन झाला असला तरी ज्या प्रमाणात लोकसंख्येबाबत जागरूकता व्हायला पाहिजे त्या प्रमाणात झालेली दिसत नाही. त्याला कारण आपण सर्वजण आहोत. केवळ लोकसंख्या दिन साजरा करून चालणार नाही तर खऱ्या अर्थाने लोकांमध्ये वाढत्या लोकसंख्येबाबत जागरूकता निर्माण करावी लागेल. जागतिक लोकसंख्या वेगाने वाढत असल्यामुळे आपल्या समोर आव्हाने निर्माण होत आहेत. याचा परिणाम नागरिकांच्या गरजांवर होतो. मानवाच्या गरजा अमर्यादित व साधने मर्यादित हे आपण अर्थशास्त्रात शिकलो आहोत. याचा परिणाम आपल्या विकसनशील देशामध्ये दिसून येतो. त्यासाठी लोकसंख्या शिक्षणाची खरी गरज आहे.

# जिल्हा नियोजन व विकास समितीच्या सदस्यपदी अनितातााई जगताप यांची निवड



शिर्डी (प्रतिनिधी) - अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन व विकास समितीच्या सदस्यपदी शिर्डीच्या माजी नगराध्यक्षा अनिताताई विजयाराव जगताप यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा नियोजन व विकास समिती ही जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाची समिती मानली जाते. या समितीमध्ये पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी आणि शासनाने नियुक्त केलेले सदस्य असतात. राज्य सरकारकडून दरवर्षी निधी मिळतो. हा निधी जिल्ह्याच्या गरजेनुसार विविध विकास कामांसाठी मंजूर केला जातो.

मतदारसंघातील गरजा ओळखून विकास कामांचे प्रस्ताव तयार करणे, अधिकाऱ्यांशी समन्वय साधून प्रस्ताव वेळेत सादर करणे, लोकांच्या प्रश्नांना प्राधान्याने मांडणे, मंजूर कामांची नियमित पाहणी करून दर्जा आणि प्रगती तपासणे, निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होत आहे यावर लक्ष ठेवणे अशा विविध समस्यांची सोडवणूक याकरिता समितीत सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

अनिताताई जगताप यांचे सासरे माजी सरपंच सोपानराव जगताप यांच्याकडून त्यांनी सामाजिक कामांची प्रेरणा घेतली. पती माजी उपनगराध्यक्ष विजयाराव जगताप यांच्यासोबत सामाजिक कामातून शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला. वेळोवेळी आंदोलने देखील केली.त्यांनी शिर्डी नगरपंचायत नगरसेविका, गटनेते व नगराध्यक्षा, साईबाबा संस्थान विश्वस्त, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष, सहसंपर्कप्रमुख असे विविध पदांची जबाबदारी त्यांनी उत्तमरित्या सांभाळली आहे.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी छत्रपती मित्रमंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमदेखील राबवले आहेत.त्यांची निवड झाल्याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचा सन्मान करत त्यांना शुभेच्छा दिल्या.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०३ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख नाहेदा अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख नाहेदा अ.लतीफ | स्वतः | ०८.०८.१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०२ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख इरशाद बेगम अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख इरशादबेगम अ.लतीफ | स्वतः | १२.०६.१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०२ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख फयमुदा लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख फयमुदा लतीफ | स्वतः | ०१.०१.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०४ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख अंजुम लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अंजुम लतीफ | स्वतः | ०३.०७.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०० दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शमशाद अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शमशाद अ.लतीफ | स्वतः | ०५.०६.१९७५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०१ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फौजिया जहिर शेख, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फौजिया जहिर शेख | स्वतः | ०८.०७.१९९९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०६ दि.०८.०७.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख शाहेदा बेगम लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख शाहेदा बेगम लतीफ | स्वतः | ०१.०९.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# जनसेवा हाच उत्सव,कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये भव्य 'सेवा पंधरवडा'

## इंदुरीकर महाराजांचे कीर्तन, रक्तदान शिबिर अन् पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप -: गणेश लांडे यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या बुलंद नेत्या, महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री तथा भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव मा. ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही बीड शहरात भव्य 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. जनसेवेलाच वाढदिवस साजरा करण्याचे माध्यम मानत विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे पाटील यांनी दिली.

राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम: सेवा पंधरवड्याअंतर्गत समाजातील विविध घटकांना केंद्रस्थानी ठेवून अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शैक्षणिक मदत: गरजू शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप. अन्नदान व सेवा: जिल्हा शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना मोफत अन्न (डबा) वाटप. वारकरी सेवा: वारकऱ्यांना छत्र्यांचे वाटप. पर्यावरण व पशुसंवर्धन: वृक्षारोपण अभियान आणि पशुधनासाठी मोफत लसीकरण शिबिर. या सर्व सेवाभावी आणि जनहिताच्या उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाणार आहे. इंदुरीकर महाराजांचे कीर्तन आणि स्नेहभोजन: या सेवा पंधरवड्याचे प्रमुख आकर्षण असलेला ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचा सुश्राव्य हरिनाम कीर्तन सोहळा गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी बीड येथील सम्राट लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे. या दिवशीच्या कार्यक्रमाची वेळ खालीलप्रमाणे असेल: दुपारी ३.०० ते



५.००: भव्य रक्तदान शिबिर दुपारी ३.०० ते ८.००: स्नेहभोजन सायंकाळी ६.०० ते ८.००: ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन विशेष उपस्थिती: महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री मा. ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे या स्वतः या कीर्तन सोहळ्यास उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे.

पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा राबविण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असून, 'जनसेवा हाच खरा उत्सव' या भावनेतून प्रत्येक वर्षी विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले जातात. यंदाही समाजहित, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी जपत हा सेवा पंधरवडा मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार असल्याचे गणेश लांडे पाटील

### उपस्थित राहण्याचे आवाहन:

सेवा पंधरवड्यातील सर्व उपक्रमांमध्ये, रक्तदान शिबिरात तसेच दि. १६ जुलै रोजी सम्राट लॉन्स, बीड येथे आयोजित स्नेहभोजन आणि ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन सोहळ्यास बीड जिल्ह्यातील नागरिकांनी, युवकांनी, महिला भगिनींनी, वारकरी बांधवांनी व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे पाटील यांनी केले आहे.

# हीच व्हावी माझी आस ,जन्मोजन्मी तुझा दास !

## पंढरीचा वारकरी , वारी चुको नेदी हरी !

पत्रकार वारक-याची माऊलीसोबत रौप्य महोत्सवी अखंड पायी वारी !

ग्रंथराज ज्ञानेश्वरी एकशेआठ पारायण पुर्ती हा योग !

शिरूर कासार/प्रतिनिधी : येथील रहिवाशी तथा पत्रकार विजयकुमार गाडेकर यांची पंच्याहत्तरीकडे वाटचाल सुरू असलेल्या आयुष्य वाटचालीत श्रीक्षेत्र आळंदी ते तिर्थराज श्रीक्षेत्र पंढरपुर पालखी सोहळ्यात पायी वारीचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असुन मोठ्या उत्साहात प्रस्थान सोहळ्यात वारीसाठी याही वर्षी सहभागी झाले आहेत ,वारीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे एकशे आठ पारायण पुर्ती हा योग जुळून आलेला आहे .

वडील रामचंद्र गाडेकर (पाटील) यांचा ज्ञानेश्वरी पारायणाचा आणि आई सिताबाई गाडेकर यांचेकडून वारीचा आलेला हा वारसा ते पुढे भक्तिभावाने सांभाळत आहेत .गाडेकर यांची आयुष्याची पंच्याहत्तरीकडे वाटचाल सुरू असली तरी पायी वारीत वृध्द होती तरणी रे याची अनुभुती त्यांचेकडे पाहिल्यानंतर येते .पत्रकारीता करत असतांना वारकरी वेशभुषा धोतर पांढरा शर्ट डोक्यावर टोपी हातात टाळ आणि मुखाने संताचे अभंग गात नाचत पंढरीची वाट चालत आहेत .पायी वारीत एक विलक्षण आनंद मिळत असल्याचे सांगुन आजवर कुठलाही प्रत्यवाय आडवा आला नाही अखंडीत पंचवीस वर्ष माऊलीच्या कृपेने हा अध्यात्मिक आनंद साध्य होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त करत शेवटी वारी चुको नेदी हरी एव्हडेच मागणे माऊली ज्ञानराजाकडे आणि भगवान पंढरीनाथाकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

शुध्द पारमार्थीकांचा संसार तो चालवतो !



कुठलीही फलाशा न बाळगता शुध्द अंतःकरणाने शुध्द परमार्थ केला तर परमेश्वर त्याचा योग क्षेम चालवतो ही अनुभुती आल्याशिवाय राहत नाही .

अध्यात्मिक प्रवास !

गाडेकर यांनी आपल्या अध्यात्मिक प्रवासा दरम्यान पारायण ,भजन ,प्रवचन ,वारी या सेवा निष्काम भावनेतून केल्या शिवाय ग्रंथराज ज्ञानेश्वरी व पंचमवेद संत तुकाराम गाथा हस्तलिखीत पारायण केले आहे ,त्यावर श्रीक्षेत्र आळंदी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे गुरूवर्य मारूतीबाबा कुरेकर ,श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री,सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री आणि भागवताचार्य साध्वी अनुराधा दिदी यांनी अभिप्राय व अशिर्वाद दिले आहेत .

अमृतमहोत्सवी मानस !

आपल्या वयाच्या अमृतमहोत्सवी वर्षात श्रीक्षेत्र आळंदी येथे माऊली मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण आणि श्रीक्षेत्र भंडारा डोंगर देहू येथे गाथा पारायणाची सेवा परमेश्वराने करून घ्यावी असा त्यांचा संकल्प आहे

# यशोधरा बुद्ध विहारात आज १२ जुलै रोजी 'सत्य अन्वेषण' शिबिर

## ध्यान, शील संवर्धन व मानसिक शांततेसाठी विनामूल्य उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

यशोधरा बुद्ध विहार ट्रस्ट, माजलगाव आणि प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जुलै २०२६ रोजी यशोधरा बुद्ध विहार, फुलेनगर येथे एकदिवसीय 'सत्य अन्वेषण' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या शिबिरात जागतिक विपश्यना आचार्य पू. भदंत विनय रक्षित महाथेरो (नागपूर) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ध्यान साधना, शील संवर्धन, मानसिक शांतता आणि सकारात्मक जीवनदृष्टी यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.शिबिर विनामूल्य असून, २० वर्षांवरील व्यक्तींनी पांढरे वस्त्र परिधान करून डायरी व पेनसह उपस्थित राहावे. पूर्ण वेळ उपस्थिती आवश्यक आहे, असे आयोजकांनी कळविले आहे.नाव नोंदणीसाठी संपर्क

बाबासाहेब जाधव : ९४०३०४१११२ सुशिलाताई चांदमारे : ९७६६९५९३८९ कमलताई डोंगरे : ९७६५३७६८०८ राजकुमार सोनवणे : ९४०३७८८१०३

# कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मृतींना २७ वर्षांची मानवंदना देत, सेवेतून जपला विठ्ठलभक्तीचा वारसा!

**पुणे । प्रतिनिधी**

**साधुसंतांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून गेवराई तालुक्यातील पाथरवाला बुद्रुक येथील दिवंगत पत्रकार कै. विठ्ठल जाधव यांनी सुरू केलेली सेवाभावी परंपरा त्यांच्या कुटुंबीयांनी गेली २७ वर्षे अखंडपणे जपली आहे. जगतगुरू संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पुण्यातील ज्ञानेश्वर माऊली खराड दिंडी क्र. १९६ (मालेगाव) मधील हजारो वारकऱ्यांसाठी यंदाही मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार आणि फराळ वाटप करण्यात आले.**

## पाथरवाला बुद्रुकच्या जाधव परिवाराकडून माऊली पालखीतील वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय सेवा व फराळ वाटप..!!




कै. विठ्ठल जाधव यांनी पत्रकारितेसोबत समाजसेवेचा वसा जपत ही परंपरा सुरू केली होती. त्यांच्या निधनानंतर पत्नी सौ. सुलभा जाधव, मुलगा हर्षवर्धन जाधव आणि भाऊ पत्रकार ज्ञानेश्वर माऊली जाधव यांनी हा सेवेचा वारसा तेवढ्याच निष्ठेने पुढे सुरू ठेवला आहे.डॉ. विजयकुमार भोर, डॉ. शुभांगी भोर, डॉ. संतोष पवार यांच्या सहकार्याने उभारलेल्या सेवा केंद्रात वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी, औषधे, फराळ आणि आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमात योगेश जाधव, बाळासाहेब भाकड, संकेत घुले, अमोल घुले, मुद्राग्रुपचे चेअरमन उमेशदादा पवार, मनिषाताई पवार यांच्यासह अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मृती जपत समाजसेवेचा हा अखंड दीप तेवत ठेवणाऱ्या जाधव परिवाराच्या कार्याचे वारकरी आणि नागरिकांकडून कौतुक होत असून, वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेचा हा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

# बुद्धविहार परिसरात अवैध दारू, गुटखा, गांज्याचा सुळसुळाट; कारवाईसाठी नागरिकांचा एल्गार

परतूर पिराजी गायकवाड :-

तालुक्यातील मौजे वडरवाडी नागसेन नगर येथील विश्वशांती बुद्धविहार परिसरात अवैध दारू, गुटखा, गांजा व अन्य अमली पदार्थांच्या खुलेआम विक्रीमुळे संतापलेल्या नागरिकांनी थेट पोलीस ठाणे गाठत कठोर कारवाईची मागणी केली आहे. धार्मिक स्थळाच्या पवित्र परिसरात सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यांमुळे सामाजिक शांतता धोक्यात आली असून परिसर व्यसनाधीनतेच्या विळख्यात सापडत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी आपल्या लेखी निवेदनातून केला आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार समाजाच्या धार्मिक कार्यासाठी उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुद्धविहाराच्या परिसरातील नगर परिषद रस्त्यावर अतिक्रमण करून काही व्यक्तींनी विनापरवाना टपऱ्या उभारल्या आहेत. या टपऱ्यांमधून देशी दारू गुटखा, गांजा तसेच अन्य अमली पदार्थांची सर्रास विक्री होत असून संबंधितांवर कोणाचाही वचक नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे बुद्धविहारालगतच इयत्ता पाचवीपर्यंतची शाळा असून लहान विद्यार्थ्यांसमोर सुरू असलेल्या या अवैध धंद्यांमुळे त्यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त



## धार्मिक स्थळाजवळ खुलेआम अमली पदार्थांची विक्री शाळकरी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न महिलांमध्ये भीतीचे वातावरण

केली आहे. व्यसनांचे आकर्षण वाढून विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की दररोज सायंकाळी ७ ते मध्यरात्री १ वाजेपर्यंत मद्यपींचा परिसरात मुक्त संचार सुरू असतो. दारूच्या नशेत महिलांशी गैरवर्तन, शिवीगाळ, दहशत निर्माण करणे असे प्रकार वारंवार घडत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित टपऱ्या नियमबाह्य पद्धतीने तब्बल २४ तास सुरू राहत असल्याचाही आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिकांनी अनेकदा संबंधितांना अवैध धंदे बंद करण्याची विनंती केली मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे बुद्धविहाराचे धार्मिक पावित्र्य मलिन होत असून परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

अवैध टपऱ्या तात्काळ हटवून दारू, गुटखा, गांजा व अन्य अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी ठाम मागणी नागरिकांनी परतूर पोलीस निरीक्षकांकडे केली आहे. तसेच वेळेत कारवाई न झाल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागू शकते असा इशाराही चर्चेतून व्यक्त होत आहे.या निवेदनावर गणेश मारुती हिवाळे, रवी बंडू घोडे, स्वप्नील पहाडे, समीर अफसर पठाण, लखन भिवाजी शिंदे, रवी फुल माळी, गंगाराम जाधव, शंकर जाधव, विशाल सोनपसारे, सोहेल शेख, दत्ता जाधव, ओमकार पाडे, स्वप्निल पाटील, रंगनाथ पाडे, सुनील पहाडे, अनिल पाडे, प्रकाश पाडे, हेमंत पहाडे यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.आता परतूर पोलिसांकडून या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून अवैध धंद्यांवर तातडीने धडक कारवाई केली जाणार का, याकडे संपूर्ण नागसेन नगर व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अल्पसंख्यांक विकास योजनेंतर्गत मूलभूत सुविधांसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची निधीची मागणी

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

बदनापूर-(प्रतिनिधी) : बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार जिल्हा परिषद सर्कलमधील अकोला,निकळक,गेवराई बाजार, ढासला, सोमठाणा, राळा हिवरा पिरवाडी, वाल्हा, पाडळी रामखेडा, गावांमध्ये अल्पसंख्यांक विकास योजनेअंतर्गत विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीसह प्रशासकीय मंजुरी देण्याची मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी आज मुंबई येथील विधान भवनात उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली.

यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विकासकामांना सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासकीय मंजुरीसह आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात शाहीखाने बांधकाम, मुस्लिम वस्त्यांमध्ये सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविणे, भूमिगत गटार बांधकाम, हायमास्ट व सौर पथदिवे उभारणे,



कब्रस्तान परिसराला कंपाउंड वॉल बांधणे, कब्रस्तानाकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण, ईदगाह परिसराचे सुशोभीकरण, विद्युतीकरणाची कामे तसेच इतर विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

या मागणीमुळे गेवराई बाजार जिल्हा परिषद सर्कलमधील अल्पसंख्यांक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा निर्माण होण्यास मदत होणार असून स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# भगवान महाविद्यालयातील प्रा.डॉ.बन्सी भीमराव वाळके यांचा १३ जुलै रोजी भव्य सेवानिवृत्ती समारंभ

## मा.आ.भीमराव धोंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर राहणार उपस्थित

आष्टी (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ, समर्पित व विद्यार्थीकेंद्रित सेवेनंतर सेवानिवृत्त होत असलेले भगवान महाविद्यालय, आष्टी येथील ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. डॉ. बन्सी भीमराव वाळके यांच्या गौरवासाठी सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भगवान महाविद्यालयाच्या सभागृहात भव्य सेवानिवृत्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक वर्षांच्या शैक्षणिक कार्यातून हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडविणाऱ्या, महाविद्यालयाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या आणि शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव जोपासणाऱ्या प्रा. डॉ. वाळके यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

प्रा. डॉ. बन्सी भीमराव वाळके यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात अध्यापन, संशोधन, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे तसेच महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, ज्ञान आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात यश संपादन करून समाजात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाविद्यालय परिवाराच्या वतीने हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणमहर्षी माजी आमदार मा. भीमरावजी धोंडे साहेब यांची उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार असून, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर तसेच सुप्रसिद्ध शाहीर देवानंद माळी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते प्रा. डॉ. वाळके यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक योगदानाचा आढावा घेत विविध मान्यवर मनोगत व्यक्त करणार





आहेत. कार्यक्रमात प्रा. डॉ. वाळके यांच्या कार्याचा गौरव करणारे विशेष भाषण, आठवणींना उजाळा देणारे मनोगत, माजी विद्यार्थ्यांच्या भावना तसेच सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेला आदर्श, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता आणि संस्थेच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न यांचा गौरवपूर्ण उल्लेख या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच समस्त वाळके परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा केवळ एका प्राध्यापकाच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम नसून, शिक्षण क्षेत्रात निष्ठेने कार्य करणाऱ्या एका कर्तृत्ववान शिक्षकाविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा अविस्मरणीय क्षण ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.शिक्षण क्षेत्राशी निगडित सर्व मान्यवर, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्था, पालक आणि नागरिकांनी या प्रेरणादायी सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रा. डॉ. बन्सी भीमराव वाळके यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन भगवान महाविद्यालय, आष्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांची अद्वैतचंद्र निवासस्थानी सदिच्छा भेट

आ.सुरेश धस यांच्या हस्ते सन्मान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) 'मिशन निपुण बीड' अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या संकल्प कार्यशाळेनिमित्त आष्टी येथे आलेल्या शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी अद्वैतचंद्र निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या सदिच्छा भेटीमध्ये बीड जिल्हा शिक्षणाधिकारी सौ. जयश्री चव्हाण यांनी सहपरिवार अद्वैतचंद्र निवासस्थानी भेट देत विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत चर्चा केली. तसेच पुणे जिल्ह्यातील तत्कालीन वाबळेवाडी येथील कार्यातून राज्यभर विशेष ओळख निर्माण करणारे आणि सध्या जालिंदरनगर येथे कार्यरत असलेले राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री. दत्तात्रय वारे यांनीही भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.





यावेळी आ. सुरेश धस यांनी शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारे शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार आहेत. मिशन निपुण बीड सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या मूलभूत शैक्षणिक क्षमतांचा भक्कम पाया तयार होण्यास मोठी मदत होणार असून अशा उपक्रमांमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांनी नमूद केले.

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविणाऱ्या समर्पित, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याचा आनंद वेगळाच असतो. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळत असून शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी अशा व्यक्तींचे योगदान अमूल्य आहे.

या सदिच्छा भेटीदरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. उपस्थितांनी मिशन निपुण बीड च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# आष्टी गटातील शेतकऱ्यांसाठी ७५ नवीन रोहित्रे बसवावीत - मागणी

तामसा (प्रतिनिधी )

जिल्हा परिषद आष्टी गटातील अनेक गावांतील कृषीपंपांसाठी असलेली रोहित्रे ओव्हरलोड झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. दिवसातून १०-१२ वेळा वीज खंडित होत असून कमी व्होल्टेजमुळे शेतकऱ्यांच्या मोटारी वारंवार जळत आहेत,येणाऱ्या रब्बी हंगामात शेतकऱ्यांची ही गंभीर समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी मुंबई येथे राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री सौ. मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात आष्टी गटातील ओव्हरलोड झालेल्या रोहित्रांऐवजी ७५ नवीन डी.पी. तात्काळ मंजूर करून बसविण्याची मागणी करण्यात आली,शेतकऱ्यांच्या प्रश्नाची तातडीने दखल घेत राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी महावितरणच्या संचालकांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत,महावितरणच्या स्तरावरून याबाबत लवकरच कार्यवाही सुरू होणार असून आष्टी गटातील शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे..

जिल्हा परिषद आष्टी गटातील अनेक गावांतील कृषीपंपांसाठी असलेली रोहित्रे ओव्हरलोड झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

# चोरंबा ग्रामपंचायतीचा अजब कारभार...!

## वयोवृध्द महिलेची जागा केली परस्पर हस्तांतरण

## घरकुलाचे काम सुरु ; महिलेची पोलीसात तक्रार

अर्धापूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील चोरंबा ग्रामपंचायतीचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे.संगणक ऑपरेटरने एका निराधार विधवा वयोवृध्द महिलेच्या नावे असलेल्या मालकीच्या जागेच्या अभिलेख्यात खाडाखोड करून परस्पर हस्तांतरण केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्या जागेवर शासनाच्या घरकुल योजनेतून घराचे बांधकाम सुरु केले असल्यामुळे या महिलेनी पोलीसात तक्रार देवून न्यायाची मागणी केली आहे.

नव्यानेच अर्धापूर तालुक्यात समावेश झालेल्या चोरंबा गावातील ग्रामपंचायतीने येथील वयोवृध्द निराधार दलित महिला धुरपताबाई रामा बहादुरे यांच्या मालकीच्या मालमत्ता क्रमांक २१० मधील जागेवर परस्पर अतिक्रमण करुन तेथे शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमधून घरकूल बांधकाम सुरु केले असून यासाठी येथील ग्रामपंचायतीचे संगणक ऑपरेटर यांनी वयोवृध्द गरिब महिलेच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेऊन तिच्या परस्पर नमुना नं. - ८ अ मध्ये खाडाखोड करुन मालकीची जागा कमी करुन त्याच जागेवर घरकुल बांधकाम केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी जागेचे मुळ मालक धुरपताबाई रामा बहादूरे यांनी अर्धापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दिली आहे. या तक्रारीत त्यांनी आपल्या स्वतःच्या मालकीच्या जागेतील नमुना नं. - ८ मध्ये नोंद असलेली जागा कमी करुन माझ्या संमतीशिवाय परस्पर हस्तांतरण केल्याचा आरोप केला असून यात ग्राम पंचायतीचे संगणक ऑपरेटर लक्ष्मण गरड आणि भिमराव बाबाराव थोरात यांनी संगनमत करुन माझ्या मालकीच्या जागेवर परस्पर अतिक्रमण करुन शासनाच्या घरकूल योजनेमधील घरकुलाचे बांधकाम सुरु केले आहे. अशी तक्रार करून याची योग्य प्रकारे चौकशी करून संबंधित दोषीवर कायदेशीर करावी. अशी मागणी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी हदगांव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना देऊन एका वयोवृध्द, निराधार विधवा महिलेला न्याय देण्याची मागणी केली आहे. मात्र या प्रकरणात कायदा आणि नियम धाब्यावर बसवून मनमानी करित चुकीची कामे करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या संबधित अधिकारी आणि कर्मचारी यांची नि:पक्षपातीपणे चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई होणार काय? किंवा वरिष्ठ अधिकारी ग्रामपंचायतीच्या अनागोंदी कारभारावर पांघरून घालणार? याकडे चोरंबासह तालुक्यातील सुजाण नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मागील दहा-बारा वर्षापुर्वी माझे पती वारले असून मला मुलगा नाही. शिवाय मी वयोवृध्द असल्यामुळे मला कामधंदा होत नाही. त्यामूळे मी दोन-दोन, तीन-तीन महिने माझ्या मुलीकडे बाहेरगावी राहते. माझ्या या मजबुरीचा गैरफायदा घेवून येथील ग्रामपंचायतीने माझ्या जागेवर परस्पर अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण काढून मला न्याय द्यावा- धुरपताबाई बहादुरे

# देगलूरसाठी ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय मंजूर करा

आ. जितेश अंतापूरकर यांची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे मागणी

देगलूर । प्रतिनिधी

देगलूर येथे ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय मंजूर करून आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार जितेश अंतापूरकर यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली.

सीमावर्ती देगलूर परिसरातील महिलांना प्रसूती व स्त्रीरोग उपचारांसाठी नांदेडला सुमारे ९० किमी प्रवास करावा लागत असल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे देगलूर येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.



या मागणीसाठी यापूर्वीही तत्कालीन आरोग्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात आला होता. सीमाभागातील महिलांना वेळेत, सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी शासनाने हा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी मागणी आ. अंतापूरकर यांनी केली.

# सो. के. एस. के. महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा



बीड /प्रतिनिधी

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक ११ जुलै २०२६ रोजी जागतिक लोकसंख्या दिन भुगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रो. डॉ. विठ्ठल जाधव कालिका महाविद्यालय, शिरुर कासार हे होते.उपस्थितांना प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पोटे बी. टी. यांनी तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना चे कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.आर. वाणी यांनी केले, तर आभार प्रा. जयंत साठे मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. गायके पी. पी., डॉ.इरलापल्ले पी. बी., डॉ. सय्य्द इमादोद्दिन यांनी काम पाहीले.

# सामाजिक कार्यकर्ते शांताराम खुडे यांना डॉक्टरेट व राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

२२ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीत होणार गौरव

पाटोदा । प्रतिनिधी

सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते शांताराम गणेश खुडे यांना त्यांच्या उल्लेखनीय जनसेवेबद्दल २२ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील विधान भवन सर्किट हाऊसमध्ये डॉक्टरेट पदवी आणि विशेष राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

गोरगरीब, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आंदोलने, जनजागृती आणि लोकशाही मार्गाने सातत्याने लढा उभारल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेण्यात



आली आहे. यापूर्वीही त्यांना राष्ट्रीय गुणगौरव, महाराष्ट्र भूषण, समाजमित्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकनायक यांसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

सध्या ते भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्यांच्या या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

## घनसावंगीत जालना पत्रकार संरक्षण कृती समितीची धडाकेबाज बैठक संपन्न

# पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी एकजुटीची वज्रमूठ वाढत्या आव्हानांवर आणि संरक्षणावर रोखठोक चर्चा

घनसावंगी मारोती सावंत :-

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि हा स्तंभ मजबूत ठेवण्यासाठी पत्रकारांची व्यापक एकजूट ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

हाच बुलंद नारा देत पत्रकारांचे हक्क, त्यांचे संरक्षण आणि पत्रकारितेपुढील वाढत्या आव्हानांवर थेट आणि रोखठोक चर्चा करण्यासाठी जालना पत्रकार संरक्षण कृती समितीच्या वतीने शुक्रवार दि. १० जुलै २०२६ रोजी घनसावंगी येथे एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि वादळी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. येथील पंचायत समिती सभागृहात दुपारी ठीक २:०० वाजता संपन्न झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील मान्यवर संपादक आणि वरिष्ठ पत्रकारांनी उपस्थित राहून पत्रकार बांधवांना मार्गदर्शन केले आणि आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकत्र येण्याचे जाहीर आवाहन केले.

केवळ भाषणे नाहीत तर थेट कृतीशील संवादसध्याच्या बदलत्या आणि आव्हानात्मक काळात पत्रकारांना दैनंदिन पातळीवर अनेक अडचणींचा आणि दडपणाचा सामना करावा लागत



आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांमध्ये केवळ संघटनात्मक बळकटी न आणता एक अभेद्य वज्रमूठ निर्माण व्हावी या मुख्य उद्देशाने या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ कोरडी भाषणे झाली नाहीत तर पत्रकारांच्या जिव्हाळ्याच्या आणि अस्तित्वाच्या विषयांवर थेट आक्रमक आणि कृतीशील संवाद साधण्यात आला.

बैठकीतील मुख्य धडाकेबाज मुद्दे आणि चर्चा

हक्क आणि संरक्षणावर थेट मार्गदर्शन बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत पत्रकारांचे कायदेशीर आणि सामाजिक हक्क नेमके काय आहेत यावर उपस्थित संपादक कैलास फुलारी व वरिष्ठ संपादिका आयेशा खान मुलानी, संपादक संतोष भुतेकर तसेच पत्रकार शेख फारुक, बालाजी अडियाल, ज्ञानेश्वर साळुंके भगवान साबळे अत्यंत अभ्यासपूर्ण व रोकडठोक मार्गदर्शन केले. पत्रकार संरक्षण कायद्याचा प्रभावी वापर पत्रकारांवर होणारे भ्याड हल्ले आणि अन्यायाविरोधात पत्रकार संरक्षण कायद्याचा अस्त्र म्हणून कसा प्रभावी वापर करावा याबाबत कायदेशीर बाजू सविस्तरपणे समजावून सांगण्यात आल्या. अन्याय सहन करायचा नाही आणि मागे हटायचे नाही असा निर्धार यावेळी व्यक्त झाला.

ग्रामीण व शहरी समस्यांवर सांगोपांग चर्चा ग्रामीण व शहरी भागातील पत्रकारांना बातमीदारी करताना येणाऱ्या रोजच्या अडचणी प्रशासकीय उदासीनता आणि दबावाचे राजकारण यावर सर्वसमावेशक चर्चा करण्यात आली.

एकच ध्यास पत्रकारांचा विकास याच मुख्य ध्येयाने संघटना अधिक मजबूत करण्याचा आणि प्रत्येक पत्रकाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

मुक्त संवादाचे खुले व्यासपीठ: उपस्थित प्रत्येक पत्रकार बांधवाला आपले मत अनुभव आणि सूचना मांडण्यासाठी व्यासपीठ खुले करून देण्यात आले होते. अनेकांनी आपल्या भावनांना यावेळी वाट करून दिली.चला एकत्र येऊया हक्क मिळवूया पत्रकारिता सबळ करूया एकजूट हीच आपली शक्ती आहे हा संदेश तळागाळातील प्रत्येक पत्रकारापर्यंत पोहोचवण्यासाठी घनसावंगी शहर तालुका तसेच ग्रामीण भागातील सर्व पत्रकार बांधवांनी कोणत्याही मतभेदांशिवाय आणि भेदभावाविना या बैठकीला प्रचंड संख्येने उपस्थिती लावली होती.

पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आता शांत बसायचे नाही तर सनदशीर मार्गाने आणि आक्रमकपणे लढा द्यायचा असा थेट इशाराच या बैठकीच्या माध्यमातून देण्यात आला आहे. या यशस्वी आणि धडाकेबाज आयोजनाबद्दल जालना पत्रकार संरक्षण कृती समितीचे सर्वत्र कौतुक होत असून या बैठकीने जिल्ह्यातील पत्रकारितेला एक नवी दिशा आणि ऊर्जा दिली आहे यात तीळमात्र शंका नाही. यावेळी बैठकी साठी घनसावंगी तालुक्यातील सुभाष बिडे, बाबासाहेब तेलगड, प्रल्हाद साळवे, मारोती सावंत,नरेंद्र जोगड,बाळासाहेब ढेरे, अशोक कंटुले, लक्ष्मीकांत कुलकर्णी, संतोष तळपे, अजय गाढे, काकासाहेब कासार, राजेंद्र थोरात, शेख युनूस, अशोक घुमरे, कैलास पवार आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आठ दिवसांच्या अंधारानंतर डोमेगावला दिलासा शेतातील लाईनवरून

## तात्पुरता वीजपुरवठा ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने पाणीपुरवठा पूर्ववत

अंबड /प्रतिनिधी :- तालुक्यातील डोमेगाव येथील दोन्ही गावठाणांना वीजपुरवठा करणारे दोन डीपी ट्रान्सफॉर्मर जळाल्याने तब्बल आठ दिवस संपूर्ण गाव अंधारात बुडाले होते. वीजपुरवठा खंडित झाल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असताना अखेर ग्रामपंचायत प्रशासनाच्या तत्परतेमुळे डोमेगावकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.गंभीर परिस्थितीची दखल घेत ग्रामपंचायतीने तातडीने पर्यायी व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेतला. शेतातील वीज लाईनवरील फॉल्ट दूर करून सुमारे एक किलोमीटर अंतरावरून तात्पुरती वीज वायर टाकण्यात आली. या धाडसी आणि तातडीच्या उपाययोजनेमुळे पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करण्यात आली आणि आठ दिवसांनंतर गावातील नागरिकांना नियमित पाणी मिळू लागले.

या कामादरम्यान डोमेगावचे सरपंच डॉ.अशोक संपतराव काळबांडे,उपसरपंच सौ. कल्पना रमेश सांगळे, पाणीपुरवठा कर्मचारी बाबासाहेब शेळके तसेच ग्रामपंचायत कार्यालयाचे शिपाई विजय सुंदरलाल चौतमल यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामाची पाहणी केली आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.दरम्यान गावातील दोन्ही जळालेले डीपी ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलून नियमित वीजपुरवठा सुरू करावा अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी महावितरण प्रशासनाकडे केली आहे. वारंवार उद्भवणाऱ्या अशा समस्यांमुळे नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागू नये यासाठी महावितरणने त्वरित कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

आठ दिवस अंधार... पाण्यासाठी वणवण... अखेर ग्रामपंचायतीच्या तातडीच्या निर्णयामुळे शेतातील लाईनवरून वीज आणून डोमेगावचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला मात्र जळालेले डीपी बदलण्याची मागणी अजूनही कायम आहे.

# डॉ.सौरभ फरताडे यांचा लोकनेते आ.सुरेश धस यांच्या हस्ते सत्कार



## पहिल्याच प्रयत्नात परदेशी वैद्यकीय पदवीधर पात्रता परीक्षा उत्तीर्ण

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) रशिया येथे वैद्यकीय पदवी (एमबीबीएस) शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेली परदेशी वैद्यकीय पदवीधर पात्रता परीक्षा (एफएमजीई) पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरित्या उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन करणारे डॉ. सौरभ प्रेमराज फरताडे यांचा लोकनेते, मराठवाडा भूषण तथा आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते आष्टी येथील अद्वैतचंद्र निवासस्थान येथे शाल, पुष्पगुच्छ व फेटा परिधान करून सत्कार करण्यात आला.

डॉ. सौरभ प्रेमराज फरताडे हे पांढरी गावचे सरपंच श्री. सुधीर पठाडे यांचे भाचे तसेच श्री. अरविंद फरताडे यांचे बंधू आहेत. त्यांनी रशिया येथे वैद्यकीय शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून भारतात डॉक्टर म्हणून वैद्यकीय सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या परदेशी वैद्यकीय पदवीधर पात्रता परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले. ही परीक्षा अत्यंत कठीण, स्पर्धात्मक आणि परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक मानली जाते. अशा परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवणे ही मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जाते.

डॉ. सौरभ फरताडे यांनी आपल्या अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ त्यांच्या कुटुंबीयांचाच नव्हे, तर पांढरी गाव, आष्टी तालुका आणि संपूर्ण परिसराचाही गौरव वाढला आहे.

परदेशात उच्च वैद्यकीय शिक्षण घेऊन भारतात सेवा देण्याच्या त्यांच्या ध्येयामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सत्कारप्रसंगी आमदार सुरेश आण्णा धस यांनी डॉ. सौरभ फरताडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या कर्तृत्वाचे विशेष कौतुक केले. ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून चिकाटीने परिश्रम घेतल्यास कोणतेही ध्येय गाठता येते, असे सांगत त्यांनी डॉ. सौरभ यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी पुढील काळात रुग्णसेवा करत समाजासाठी आदर्श कार्य करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.डॉ. सौरभ फरताडे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून

## शासकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकीचा आदर्श

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईकडून वारकऱ्यांचे स्वागत, फराळ वाटप व रस्ता सुरक्षा जनजागृती

अंबाजोगाई- प्रतिनिधी

आषाढी वारीच्या पवित्र सोहळ्यानिमित्त उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांनी शासकीय सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचा आदर्श उपक्रम राबविला. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री विनोद साळवी यांच्या तसेच सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री सिद्धेश्वर घुले यांच्या पुढाकाराने शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी लातूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत सम्राट चौक, लोखंडी सावरगाव (लातूर रोड) येथे शेगाव ते पंढरपूर तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतून पायी वारीसाठी निघालेल्या विविध पालख्या व हजारो वारकऱ्यांसाठी फराळ वाटप तसेच रस्ता सुरक्षा जनजागृतीचा व्यापक उपक्रम उत्साहात पार पडला.आषाढी एकादशीच्या निमित्ताने लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या सेवेसाठी तसेच त्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून हा उपक्रम राबविला.

कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि वाहन प्रतिनिधींनी स्वतः उपस्थित राहून वारकऱ्यांचे स्वागत केले व फराळाचे साहित्य वितरित केले. वारकऱ्यांनीही या सेवाभावी उपक्रमाचे मनापासून स्वागत करत परिवहन विभागाच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले.यावेळी रस्ता सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा विषय केंद्रस्थानी ठेवण्यात आला. वारकऱ्यांना रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्याचे नियम, वाहतुकीच्या दिशेचे पालन, महामार्ग ओलांडताना घ्यावयाची खबरदारी, रात्रीच्या वेळी परावर्तित (रिफ्लेक्टर) साहित्याचा वापर, वाहनांपासून सुरक्षित अंतर राखणे, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाशी संपर्क साधण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणारी माहितीपत्रके वारकऱ्यांना वाटण्यात आली.



उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री विनोद साळवी यांनी सांगितले की, परिवहन विभागाचे कार्य केवळ वाहन प्रशासनापुरते मर्यादित नसून नागरिकांमध्ये सुरक्षित वाहतुकीची जाणीव निर्माण करणे आणि समाजोपयोगी उपक्रम राबविणे हे देखील विभागाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. आषाढी वारीसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यात लाखो भाविक सहभागी होत असल्याने प्रत्येक वारकऱ्यापर्यंत रस्ता सुरक्षेचा संदेश पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. सुरक्षित वारी हीच खरी सेवा असून अपघातमुक्त प्रवासासाठी प्रत्येकाने वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमामध्ये मोटार वाहन निरीक्षक श्री प्रशांत वनवे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री ज्ञानेश्वर कांबळे, श्री अक्षय कातळे, श्रीमती ऐश्वर्या कराड, लिपिक श्री सिद्धेश्वर घुले, श्री दिलीप सुरवसे,व इतर सर्व कर्मचारी तसेच श्री रवी मुळे, श्री सुरेश माने, श्री अशोक मोरे, श्री प्रशांत डोरले, श्री पवन लाहोटी, श्री आकाश काळे, श्री मोरे मामा, श्री अकबर शेख, शेरू भाई, श्री अशोक पवार, श्री मुकुंद जोशी, श्री स्वप्निल घाडगे आणि इतर सर्व वाहन प्रतिनिधींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

सदर उपक्रमाला परिसरातील नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शासकीय यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी आणि वाहन प्रतिनिधी यांनी एकत्रितपणे समाजहितासाठी केलेल्या या सेवाभावी कार्यामुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाईची समाजाभिमुख भूमिका अधिक अधोरेखित झाली. सेवाभाव, जनजागृती, रस्ता सुरक्षा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्यात या उपक्रमाला मोठे यश मिळाले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे सांडस चिंचोलीचा मुख्य रस्ता चिखलमय

## दुरुस्ती न झाल्यास देपेगाव ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषणाचा इशारा

माजलगाव प्रतिनिधी

तालुक्यातील सांडस चिंचोली-देपेगाव या मुख्य रहदारीच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, तातडीने दुरुस्ती न केल्यास देपेगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा सांडस चिंचोली येथील ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी माजलगाव यांना दि १० जुलै रोजी दिलेल्या निवेदनात दिला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, देपेगाव ग्रामपंचायतीने गावातील सांडपाणी जाणीवपूर्वक मुख्य रस्त्यावर सोडल्यामुळे संपूर्ण रस्ता चिखलमय व खराब झाला आहे. त्यामुळे या मार्गावरून पायी तसेच वाहनाने प्रवास करणे अत्यंत धोकादायक आणि जिकिरीचे बनले आहे.



या रस्त्यावरून सांडस चिंचोली, गोविंदपूर, बोरगाव, आळशेवाडी आदी गावांतील नागरिकांसह शालेय विद्यार्थी दररोज ये-जा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी अनेक वेळा देपेगाव ग्रामपंचायतीकडे तक्रारी व मागण्या केल्या.

मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, मागील वर्षी सांडस चिंचोली येथील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मुरूम टाकून हा रस्ता स्वतः दुरुस्त केला होता. गावातील विकासकामांच्या पार्श्वभूमीवर येथील ग्रामसेवकांना राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२६ मध्ये आदर्श पुरस्काराने गौरविण्यात आले होते. मात्र, दुसरीकडे मुख्य रस्त्याची झालेली दुर्दशा पाहता ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.ग्रामस्थांनी प्रशासनाला आवाहन केले आहे की, लोकभावनेचा आदर करून संबंधित रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. अन्यथा देपेगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे. दिलेल्या निवेदनावर बिजू कदम,अशोक गिरी,बाबासाहेब कापसे,दीपक भोसले सह गावातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा नवा संकल्प

# आ. सुरेश धस यांचा 'आमदार श्री शाळा' उपक्रम जाहीर

'मिशन निपुण बीड' कार्यशाळेत सरकारी शाळांना रोल मॉडेल बनविण्याचा निर्धार

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीडचा शिक्षण विभाग आणि डायट, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथे आयोजित 'मिशन निपुण बीड' संकल्प कार्यशाळेत आमदार सुरेश धस यांनी सरकारी शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी 'आमदार श्री शाळा' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची घोषणा केली.

या उपक्रमांतर्गत प्रथम टप्प्यात आष्टी मतदारसंघातील उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळा दत्तक घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास केला जाणार आहे. राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष समिती स्थापन करून शाळांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाणार असून, पुढील टप्प्यात आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यात उपक्रमाचा विस्तार होणार आहे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त शिक्षकांची पदेही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता, संख्याज्ञान आणि आधुनिक अध्यापन पद्धतींवर भर देण्यात आला. सरकारी शाळा खाजगी शाळांइतक्याच सक्षम करून त्या




राज्यासाठी आदर्श ठराव्यात, असे मत आ. सुरेश धस यांनी व्यक्त केले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री चव्हाण, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. भगिरथी गिरी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके, नितीन करडुळे यांच्यासह जिल्ह्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# १४ वर्षांचा संघर्ष अखेर संपला गंगासावंगीचा शेतरस्ता खुला प्रशासनाच्या कारवाईने

## शेतकऱ्यांना दिलासा

परतूर पिराजी गायकवाड :-

तालुक्यातील गंगासावंगी येथील शेतकऱ्यांचा तब्बल १४ वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतरस्त्याचा प्रश्न अखेर निकाली निघाला आहे.अप्पर जिल्हाधिकारी श्री.मिसाळ यांच्या आदेशानुसार तसेच तहसीलदार डी.एन.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत रस्त्यावरील अडथळे हटवून शेतरस्ता खुला केला.या निर्णयामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून दीर्घ संघर्षाला अखेर न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.गेल्या १४ वर्षांपासून रस्त्याच्या वादामुळे शेतकऱ्यांना शेतात ये-जा करणे शेतीमालाची वाहतूक करणे तसेच दैनंदिन शेतीची कामे पार पाडताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.अनेकवेळा प्रशासनाकडे निवेदने पाठपुरावा आणि मागण्या करूनही प्रश्न प्रलंबितच राहिला होता.मात्र अखेर प्रशासनाने ठोस भूमिका घेत कारवाई केल्याने हा वाद कायमचा संपुष्टात आला.

महसूल विभागाच्या आदेशानुसार पोलीस बंदोबस्तात रस्त्याची मोजणी करण्यात आली.गट क्रमांक १६४ व १६५ मधील उत्तर बांधावरून पूर्व-पश्चिम दिशेने हरिभाऊ माधवराव टेकाळे व इतर शेतकऱ्यांसाठी शेतरस्ता खुला करण्यात आला. रस्त्यातील सर्व अडथळे हटवून वाहतुकीसाठी मार्ग मोकळा करण्यात आला.

या कारवाईवेळी मंडळ अधिकारी सौ.टी.आर.माळी, सजाचे श्री.कोकाटे हादगाव, श्री.बी.एस.मापारी,एम.एस. लोखंडे,पोलीस विभागाकडून पीएसआय चाटे,श्याम गायके, पांढरे,महिला पोलीस रिढे मॅडम,पानजंजाळ,प्रधानसाहेब, पोलीस पाटील कृष्णा टेकाळे तसेच महसूल व पोलीस प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.संपूर्ण कारवाई शांततेत आणि कायदेशीर पद्धतीने पार पडली.

रस्ता खुला झाल्यामुळे आता शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करणे शेतात ये-जा करणे आणि शेतीची कामे करणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार मानत समाधान व्यक्त केले.गंगासावंगीतील शेतकऱ्यांची एकजूट चिकाटी आणि १४ वर्षांचा सातत्यपूर्ण संघर्ष अखेर फळाला आला असून हा दिवस गावाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. प्रशासनाच्या निर्णायक कारवाईमुळे शेतकऱ्यांच्या न्यायाच्या लढ्याला यश मिळाले असून संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# मोजपुरी शिवारातील जुगार अड्ड्यावर अपर पोलिस अधीक्षक पथकाची धडक कारवाई

## झन्ना-मन्ना जुगार रंगात असतानाच पोलिसांचा छापा ३.६७ लाखांचा मुद्देमाल जप्त पाच जण ताब्यात

जालना शेख फारुक :-

जालना जिल्ह्यातील मोजपुरी शिवारात सुरू असलेल्या झन्ना-मन्ना हारजितीच्या जुगार अड्ड्यावर अपर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने शुक्रवारी दि.१० जुलै धडक कारवाई करत पाच जुगाऱ्यांना रंगेहात पकडले. या कारवाईत रोख रक्कम, पाच मोबाईल फोन आणि पाच मोटारसायकलींसह एकूण ३ लाख ६७ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.अपर पोलिस अधीक्षक कार्यालयातील पोलिस अंमलदारांना गोपनीय बातमीदारामार्फत मोजपुरी शिवारातील विकास खरात यांच्या शेताजवळील मोकळ्या जागेत काही इसम पैशांवर झन्ना-मन्ना नावाचा हारजितीचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीनंतर विशेष पथकाने घटनास्थळी सायंकाळी सुमारे ५.५५ वाजता अचानक छापा टाकला.छाप्यावेळी काही इसम गोलाकार बसून पैशांवर जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी तत्काळ सर्वांना ताब्यात घेत कारवाई केली.

कारवाईत ताब्यात घेण्यात आलेले आरोपी

प्रसाद लक्ष्मण देशमुख वय ४८, रा. रांजणी ता. घनसावंगी बसवेश्वर अनंतप्पा कोरेगावकर वय ४१ रा.चित्तीपुरी जि. जालना, गोपीनाथ माणिक पाटोळे वय ४२ रा.रांजणी ता.घनसावंगी, प्रवीण नारायणराव भोसले वय ५२ रा.मोहे जळगाव ता. घनसावंगी, अमोल भीमराव खंडेकर वय ३२ रा.घोडेगाव जि.जालना जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रोख रक्कम रु.१,१२,११० विविध कंपन्यांचे ५ मोबाईल फोन बजाज डिस्कव्हर एम एच २१ एक के ६४३०, हिरो स्प्लेंडर प्लस एम एच २१ एम के २१०३ होंडा शाईन एम एच २१ एक के ४९७८ रॉयल एनफिल्ड बुलेट एम एच १५ एफ इ २६११, होंडा पॅशन प्रो एम एच २१ बी.एल ८९५९ एकूण जप्त मुद्देमाल रु.३,६७,३१० या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार



प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींसह जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलिस अधीक्षक तेघबीर सिंह संधू व अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि योगेश खटकळ तसेच निखिल गावकवाड, प्रताप सुंदर्डे, विशाल साळुंके आणि अपर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

अवैध धंद्यांवर पोलिसांचा वचक कायम जालना जिल्ह्यात अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरू असून मोजपुरीतील ही कारवाई जुगार व्यवसायाला मोठा दणका मानली जात आहे.

# पहिले बियाणे उगवलेच नाही,दुसरे बियाणे दुबार पेरणीत सडलेले निघाले

## केज च्या ६ गावांत बियाणे उगवले नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार; कृषी विभागाकडून चौकशी सुरू

केज/प्रतिनिधी

चालू खरीप हंगामात पावसाचे प्रमाण आधीच कमी असताना नामांकित कंपन्यांच्या सदोष सोयाबीन बियाण्यामुळे केज तालुक्यातील शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कृषी सेवा केंद्रातून खरेदी केलेले पहिले बियाणे शेतात उगवलेच नाही,तर दुबार पेरणीसाठी आणलेले दुसरे बियाणे चक्क सडलेले निघाल्याने बळीराजा दुहेरी संकटात सापडला आहे.



६४ हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी

केज तालुक्यात चालू हंगामात आतापर्यंत सुमारे ७० हजार हेक्टर वर पेरणी झाली असून त्यापैकी ६४ हजार हेक्टर क्षेत्रावर एकट्या सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. साळेगाव,नांदुरघाट, युसुफवडगाव, बनसारोळा,तांबवा, बोरगाव (बु.) आणि मांगवडगाव परिसरा तील शेतकऱ्यांनी महाबीज आणि जे.एस.कंपनीचे बियाणे मोठ्या आशेने पेरले होते.मात्र,पेरणी नंतर अनेक दिवस उलटूनही बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले. शेतकऱ्यांनी या प्रकरणी तातडीने तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी नोंदवल्या आहेत.

कृषी पथकाकडून प्रत्यक्ष शेताची पाहणी

तक्रारींची दखल घेत उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड,कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा.अरुण गुठे आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने प्रत्यक्ष बाधित शेतांमध्ये जाऊन पाहणी केली. प्रथमदर्शनी बियाण्याची उगवण क्षमता अत्यंत कमी असल्याचे आढळून आले असून,संबंधित लॉटचे नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

लॉटचे नमुने प्रयोग शाळेकडे - प्रा.अरुण गुठे (शास्त्रज्ञ,कृषी विज्ञान केंद्र)

शेतकऱ्यांच्या तक्रारी नंतर आम्ही शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असून, प्रथमदर्शनी बियाण्याची उगवण क्षमता कमी असल्याचे दिसून आले आहे. संबंधित लॉटचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तपासणी -सागर पठाडे तालुका कृषी अधिकारी,केज केज तालुक्यात ६४ हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार न उगवलेल्या सोयाबीन च्या बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.अहवालानंतर पुढील कारवाई केली जाईल.

दुबार पेरणीतही फसवणूक ; ८० हजारांचा फटका

साळेगाव येथील शेतकरी संदिपान यांनी आदिती कृषी सेवा केंद्रातून खरेदी केलेले बियाणे न उगवल्या मुळे पुन्हा महाबीज (६१२ वाण) बियाणे खरेदी केले.मात्र,दुबार पेरणी करताना हे दुसरे बियाणे पूर्णपणे सडलेले आढळले.दहा दिवस उलटूनही त्याची उगवण झाली नाही. पहिल्या आणि दुसऱ्या पेरणीसाठी त्यांना तब्बल ८० हजार रुपये खर्च आला असून, शासनाने तात्काळ आर्थिक नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी त्यांच्या कुटुंबाने केली आहे.

बाधित शेतकरी

बियाणे न उगवल्या मुळे संदिपान टोपे, सौरभ करपे,एकनाथ इंगळे,जयश्री टोपे, मुकेश गिते,कैलास पटणे,शफिक सय्यद, भागवत तिडके आणि विकास तिडके यांच्या सह केज तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.कृषी विभागाने कंपन्यांवर कडक कारवाई करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे.

## साधुसंतांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

# कै. विठ्ठल जाधव यांच्या सेवाभावी परंपरेचा २७ वर्षांपासून अखंड वारसा

पाथरवाला बुद्रुकच्या जाधव परिवाराकडून पुण्यात माऊलीच्या पालखीतील वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय सेवा व फराळ वाटप

साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा या संतवचनाचा प्रत्यय देणारी सेवाभावी परंपरा गेवराई तालुक्यातील पाथरवाला बुद्रुक येथील पत्रकार कै. विठ्ठल जाधव यांच्या कुटुंबाने तब्बल २७ वर्षांपासून जपली आहे. जगतगुरु संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पुण्यात येणाऱ्या ज्ञानेश्वर माऊली खराड दिंडी क्र. १९६ (मालेगाव) मधील हजारो वारकऱ्यांसाठी दरवर्षी मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार आणि फराळ वाटपाचा उपक्रम राबविला जात असून, यंदाही ही सेवा मोठ्या उत्साहात पार पडली.

कै. विठ्ठल जाधव हे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पुणे शहराध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी समाजसेवेचा वसा घेतला होता. पुण्यातील मानस हॉस्पिटलचे डॉ. विजयकुमार भोर, डॉ. शुभांगी भोर (यशवंत हॉस्पिटल) तसेच डॉ. संतोष पवार यांच्या सहकार्याने वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून वैद्यकीय शिबिर व फराळ वाटपाची परंपरा त्यांनी सुरू केली.


मात्र नियतीने कै. विठ्ठल जाधव यांना अकाली हिरावून घेतले. तरीही त्यांचे कार्य थांबले नाही. त्यांच्या पत्नी सौ. सुलभा विठ्ठल जाधव यांनी मुलगा हर्षवर्धन जाधव, भाऊ पत्रकार ज्ञानेश्वर माऊली जाधव (महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई) यांच्या सोबत हा सेवेचा वारसा समर्थपणे पुढे चालविला आहे. या उपक्रमात योगेश जाधव, बाळासाहेब भाकड, संकेत घुले, अमोल घुले, मुद्राग्रुपचे चेअरमन उमेशदादा पवार, मनिषाताई पवार यांच्यासह अनेक सेवाभावी कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. मार्केट यार्ड परिसरात उभारलेल्या सेवा केंद्रात वारकऱ्यांना मोफत औषधे, आरोग्य



तपासणी, फराळ व आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यात आली.

वारकरी संप्रदायातील सेवाभावाची परंपरा जपत जाधव परिवार गेली २७ वर्षे निस्वार्थपणे समाजसेवा करत आहे. कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या कुटुंबीयांनी सुरू ठेवलेले हे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेचा जिवंत आदर्श म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

# हरणांच्या कळपांचा शेतात धुमाकूळ; नायगाव तालुक्यात पिके धोक्यात



**कापूस, सोयाबीन, तूर पिकांचे मोठे नुकसान; वनविभागाने तातडीने बंदोबस्त करावा, शेतकऱ्यांची आर्त मागणी**

नायगाव तालुक्यातील कोलंबी,मांजरम,दरेगाव, गंगणबीडसह आसपासच्या गावांच्या शिवारात हरणांच्या कळपांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून खरीप हंगामातील पिकांवर मोठे संकट ओढवले आहे. आधीच यंदा पावसाने दडी मारल्याने आणि खरीप पेरण्या जवळपास महिनाभर उशिरा झाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. त्यात आता हरणांचे मोठे कळप रात्रीच्या वेळी आणि पहाटे शेतात घुसून कापूस, सोयाबीन, तूर यांसारख्या पिकांची नासधूस करीत असल्याने बळीराजा अक्षरशः हवालदिल झाला आहे.

गंगणबीड, नायगाव, देगाव, पळसगाव, टाकळगाव, लालवंडी, राणसुगाव, हिप्परगा, घुंगराळा आदी गावांच्या शिवारात हा उपद्रव अधिक तीव्र झाला आहे. विशेषतः डोंगरकपारी व खोऱ्यातील शेतजमिनींमध्ये हरणांचे कळप मोठ्या प्रमाणात फिरत असल्याने शेतकऱ्यांना पिके वाचवणे कठीण झाले आहे. कोवळ्या अवस्थेतील सोयाबीन, तूर, कापूस या पिकांवर हरणांचा सर्वाधिक मारा होत असून रातोरात पिके खरडून टाकली जात आहेत.

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पेरणी करून उगवलेली पिके लेकरांप्रमाणे जपण्याची वेळ आली आहे. दिवसभर शेतात राबल्यानंतर रात्री उशिरापर्यंत शेतातच थांबून पिकांची राखण करावी लागत आहे. अंधार पडेपर्यंत आणि पहाटेपर्यंत शेतकरी शिवारात ठाण मांडून बसत असला, तरी हरणांचे कळप अचानक शेतात शिरून काही क्षणांत मोठे नुकसान करून जात असल्याने शेतकरी त्रस्त झाला आहे. अनेक शेतकरी कुटुंबांची झोप उडाली असून खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पिकांचे संरक्षण हा गंभीर प्रश्न बनला आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, केवळ हरणेच नव्हे तर रानडुक्कर, मोर, गवळणगायी यांसारख्या वन्य प्राण्यांचाही शिवारात मोठा वावर वाढला आहे. हे प्राणी कष्टाने केलेल्या पेरणीची नासधूस करीत असून शेतकऱ्यांच्या हाती निराशाच येत आहे. एकीकडे बियाणे, खते, मजुरी, मशागत यासाठी खर्च वाढत असताना दुसरीकडे वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे उत्पादनावरच गदा येत असल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडला आहे.

# सिरसाळ्यात आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना ग्रामीण विकासाचा प्रत्यक्ष अनुभव

## ग्लोबल विकास ट्रस्टमध्ये सात दिवसीय निवासी एनजीओ प्रशिक्षण संपन्न

बीड । प्रतिनिधी

आदित्य कृषी महाविद्यालयाच्या बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परळी तालुक्यातील सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टमध्ये सात दिवसीय निवासी एनजीओ प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांचे कार्य, शाश्वत व सेंद्रिय शेती, पाणी व्यवस्थापन, रेशीम शेती, गोशाळा व्यवस्थापन तसेच विविध कृषी विकास योजनांची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. ग्रामीण विकासातील स्वयंसेवी संस्थांचे योगदान विद्यार्थ्यांना जवळून अनुभवता आले.

मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य श्याम भूतडा यांच्या नियोजनाखाली झालेल्या प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे अधिकारी व कर्मचारीवृंद यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. धनंजय सातपुते, डॉ. खेडकर, डॉ. येडगे आणि डॉ. कुमार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य उपक्रम

महाविद्यालयाने आयोजित केलेले हे सात दिवसीय निवासी प्रशिक्षण आमच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरले. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव आणि एन.जी.ओ.चे कार्य जवळून पाहता आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी




महाविद्यालयाचा हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे.

-अभिजीत बोंदर, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

विद्यार्थीहितासाठी आदर्श उपक्रम

ग्लोबल विकास ट्रस्टच्या भेटी दरम्यान आम्हाला शाश्वत शेती, सेंद्रिय पद्धती आणि पाणी व्यवस्थापनाचे उत्तम तंत्रज्ञान शिकायला मिळाले. भविष्यात कृषी पदवीधर म्हणून काम करताना या व्यावहारिक ज्ञानाचा मोठा फायदा होईल. विद्यार्थीहिताला प्राधान्य देणारा हा एक आदर्श उपक्रम आहे.

-कृष्णा देवकते, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

# गजानन कारखान्याचे माजी संचालक चंद्रभान माने यांचे निधन

बीड प्रतिनिधी

गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक आणि सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व चंद्रभान नानाभाऊ माने (वय ७५, रा. मन्यारवाडी, ता. बीड) यांचे शनिवारी (ता. ११) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मन्यारवाडी गावासह संपूर्ण तालुक्यात आणि राजकीय वर्तुळात मोठी शोककळा पसरली आहे.

स्व. चंद्रभान माने हे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचे अत्यंत विश्वासू आणि खंदे सहकारी म्हणून ओळखले जात होते. जयदत्त क्षीरसागर यांच्या अनेक राजकीय व सामाजिक चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांच्या निधनामुळे क्षीरसागर गटासह बीडच्या राजकीय आणि सहकार क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. तसेच ते 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ठझख) दिव्यांग आघाडी'चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश धर्मराज माने यांचे चुलते होत.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेत पार्थिवाचे अंतिम दर्शन



घेतले आणि माने परिवाराचे सांत्वन केले. स्व. चंद्रभान माने यांच्या पार्थिवावर शनिवार ११ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता मन्यारवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. माने कुटुंबीयावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवू नका

## अन्यथा महमद खमरोहीन यांचा आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

महावितरणकडून ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट वीज मीटर बसविण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोप करत बीड जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष



महमद खमरोहीन यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात वाढ होत असून भविष्यात प्रीपेड वीज व्यवस्था लागू करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. ग्राहकांची स्पष्ट संमती घेतल्याशिवाय स्मार्ट मीटर बसवू नयेत, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# वरुड-नाव्हा रस्ता घोटाळा शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारीला निवेदन ७ दिवसांत चौकशीचे आदेश

जालना शेख फारुक :-

गेल्या दोन-तीन वर्षांपासून वरुड-नाव्हा परिसरातील रस्त्याची झालेली दुरवस्था आणि ठेकेदारांनी संगनमताने केलेल्या निकृष्ट कामाविरोधात अखेर परिसरातील बळीराजाचा संयम सुटला आहे. काल, ९ जुलै रोजी वरुड-नाव्हा परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी थेट जालना जिल्हाधिकारी अस्मिता मित्तल यांची भेट घेऊन त्यांना आक्रमक निवेदन सादर केले. ठेकेदारांच्या थातूरमातूर कारभाराचा पंचनामा करत शेतकऱ्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने ७ दिवसांत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार दोन-तीन वर्षांपूर्वी रंगनाथ महाराज मठ ते समृद्धी महामार्ग जोडणाऱ्या रस्त्याचे काम करण्यात आले होते. परंतु संबंधित ठेकेदारांनी केवळ कागदोपत्री घोडे नाचवत अत्यंत थातूरमातूर आणि निकृष्ट दर्जाचे काम केले. रस्ता पूर्ण झाल्याचे दाखवून शासकीय तिजोरीतून लाखो रुपयांची बिले देखील उचलण्यात आली मात्र प्रत्यक्षात हा रस्ता अल्पावधीतच उखडला असून सध्या या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या भ्रष्टाचाराचा फटका रोज शेकडो शेतकऱ्यांना आणि प्रवाशांना सहन करावा लागत आहे.

शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा आणि जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

नेहमीच दुर्लक्षित राहणाऱ्या या मुद्द्यावर आता वरुड-नाव्हा परिसरातील शेतकरी एकवटले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचलेल्या शिष्टमंडळाने आक्रमक भाषेत आपली कैफियत मांडली. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या अशा भ्रष्ट ठेकेदारांना पाठीशी का घातले जात आहे? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

या प्रकरणाची तात्काळ दखल घेण्यात येत असून पुढील ७ दिवसांच्या आत संबंधित कामाची सखोल चौकशी केली जाईल. यात जो कोणी दोषी आढळेल त्या ठेकेदारावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

अस्मिता मित्तल जिल्हाधिकारी जालना.

शिष्टमंडळाची प्रमुख उपस्थिती

या आंदोलनात आणि निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात परिसरातील प्रमुख नागरिक




आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये अनिल सरकटे,रतन शिंदे नारायण वाडेकर,विठ्ठल मस्के, रमेशजी मस्के,गणेश भुतेकर, लक्ष्मण कुलकर्णी,सुदामा वाव्हळे,बबन इंगळे,शंकर घुले माहदु झारखंडे, यांच्यासह वरुड-नाव्हा परिसरातील असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते. प्रशासनाने दिलेला ७ दिवसांचा अल्टिमेटम आता सुरू झाला असून या कालावधीत दोषींवर काय कारवाई होते याकडे संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करू असा इशाराही शेतकऱ्यांनी शेवटी दिला.

# संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत

## शिरूर ग्रामस्थांच्या स्वागताने वारकरी भारावले

मानूर /प्रतिनिधी

शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे शिरूर कासार शहरात एकादशीच्या मुहूर्तावर आगमन झाले. सालाबादप्रमाणे याही वर्षी फटाक्यांची आतषबाजी आणि सवाद्य मिरवणूक काढून संत एकनाथ महाराजांच्या पादुका ग्रामस्थांनी पालखीचे भोई होत मारुती मंदिरात आणल्या.या वेळी परंपरेप्रमाणे नाथवंशज यांचे स्वागत करून पालखी ग्रामस्थांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली. शिरूर शहरासह परिसरातील आबालवृद्ध आणि भाविकांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. शिरूर तालुक्यातील घोगस पारगाव येथे मुक्काम केल्यानंतर सकाळी पालखी मार्गस्थ झाली.शिरूर शहरातील हजारो ग्रामस्थ पालखीची आतुरतेने वाट पाहत होते.दुपारी बारा वाजता शिरूर शहराच्या




सीमेवर दिंडीचे आगमन झाले आणि भाविकांची प्रतीक्षा संपली.

फराळाचे स्टॉल आणि घरोघरी फराळसंत एकनाथ महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत केल्यानंतर शहरात विविध ठिकाणी वारकऱ्यांच्या सोईसाठी फराळाचे स्टॉल लावण्यात आले होते.नगरपंचायतचे बांधकाम आणि पाणी पुरवठा समिती सभापती अरुण भालेराव यांच्यासह युवा नेते अजय कुचेरिया,दिनेश गाडेकर प्रतिष्ठित व्यापारी तुकाराम काळे,महेश डोंगरे यांनी वारकऱ्यांच्या फराळाची उत्तम व्यवस्था केली होती.ग्रामस्थांनी देखील आपल्या घरोघरी वारकऱ्यांना घेऊन जात फराळ देण्याचे काम केले.

# मिडसांगवीत संत एकनाथ महाराज पालखीचे पहिले भव्य रिंगण; दहा हजार वारकऱ्यांचा भक्तिमय सहभाग

मानूर प्रतिनिधी ह्न

शांतिब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या ४२७ व्या पालखी सोहळ्याचा भक्तिमय प्रवास शनिवारी (ता. १०) पाथर्डी तालुक्यातील भगवानगडाच्या पायथ्यालगत असलेल्या मिडसांगवी येथे अत्यंत उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाच्या वातावरणात पार पडला. पालखी सोहळ्यातील पाच प्रमुख रिंगणांपैकी पहिले भव्य-दिव्य रिंगण याच ठिकाणी सुमारे दहा हजार वारकरी व भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाले. हरिनामाच्या अखंड गजराने, टाळ-मृदुगाच्या निनादाने आणि विठ्ठलभक्तांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सालसिद्धबाबा संस्थानचे महंत हनुमान महाराज शास्त्री तसेच मिडसांगवी ग्रामस्थांनी पालखीचे पारंपरिक पद्धतीने जल्लोषात स्वागत केले. पालखी आगमन होताच नाथवंशजांचे यथोचित स्वागत करण्यात आले. ब्रह्मवृंदांच्या वेदमंत्रांच्या मंगलघोषात संत एकनाथ महाराजांच्या पादुकांची विधिवत पूजा, आरती व धार्मिक विधी संपन्न झाले. उपस्थित भाविकांनी पालखीचे दर्शन घेत संतांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

पालखी विसाव्यासाठी यंदा



उभारण्यात आलेला भव्य, आकर्षक व सुशोभित ओटा भाविकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या ओट्यावर संत एकनाथ महाराजांची पालखी विराजमान होताच ज्ञानोबा-तुकाराम, एकनाथ महाराज की जय आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठल या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. पालखीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या शिस्तीत रांगा लावल्या होत्या.

यानंतर हरिनामाच्या अखंड गजरात भजन, कीर्तन, अभंगगायन व नामस्मरणाचा कार्यक्रम रंगला. वारकरी संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे टाळ-मृदुगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या घोषात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. त्यानंतर पालखी सोहळ्यातील पाच प्रमुख रिंगणांपैकी पहिले भव्य-दिव्य रिंगण पार पडले. रिंगण सुरू होताच हजारो वारकरी भक्तिभावाने सहभागी झाले. संतांविषयीची नितांत श्रद्धा, विठ्ठलभक्ती आणि वारकरी संप्रदायाची शिस्त यांचे दर्शन या सोहळ्यात घडले. रिंगण सोहळा पाहण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

बाबुराव पठाडे व मिडसांगवी ग्रामस्थांच्या वतीने हजारो वारकरी व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. पालखी सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने भारावून गेले होते.

या धार्मिक सोहळयासाठी शिरूरकासार तालुक्यासह पाथर्डी, आष्टी, बीड व परिसरातील हजारो वारकरी, भाविक, महिला, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत एकनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यामुळे मिडसांगवी परिसरात दिवसभर भक्ती, श्रद्धा, सेवा आणि अध्यात्माचा मंगलमय उत्सव अनुभवायला मिळाला.

सोहळा संपल्यानंतर पालखी पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होताना सालसिद्धबाबा संस्थानचे महंत हनुमान महाराज शास्त्री, मिडसांगवी ग्रामस्थ तसेच परिसरातील हजारो वारकरी व भाविकांनी संत एकनाथ महाराजांच्या पालखीला भावपूर्ण निरोप दिला. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदुगाच्या निनादात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात संत एकनाथ महाराजांची पालखी पुढील मुक्कामाच्या दिशेने मार्गस्थ झाली.

# खासदार बजरंग सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश



## राष्ट्रीय महामार्गांच्या कामांची उच्चस्तरीय चौकशी आणि ऑडिट ला सुरुवात

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांमध्ये निकृष्ट दर्जा,संथ गती आणि अनेक ठिकाणी रखडलेली कामे याबाबत खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा.श्री. नितीन गडकरी यांना पत्राद्वारे तक्रार केली होती.संबंधित कामांची उच्चस्तरीय चौकशी करून त्रयस्थ संस्थे मार्फत ऑडिट करावे, दोषी अधिकारी व संबंधितांवर कारवाई करावी तसेच रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी त्यांनी केली होती.या पत्राची दखल घेत दिल्लीहून केंद्रीय पथक बीड जिल्ह्यात दाखल झाले असून विविध ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांच्या कामांचे नमुने (सॅम्पल) घेण्यास सुरुवात झाली

# तामसा येथील मुक्रम पठाणसह १५ जण 'उमरा' यात्रेसाठी रवाना..



तामसा - तामसा येथील प्रतिष्ठित भुसार व्यापारी मुक्रम पठाण यांचे सह १५ जण आपल्या संपूर्ण परिवारासह पवित्र मक्का 'उमरा ' यात्रेसाठी रवाना झाले असून त्यांचे अनेकांनी स्वागत केले आहे.

मुस्लिम समाजाची अत्यंत पवित्र मानली जाणारी मक्का 'हज' यात्रा जीवनात एकदा करावी. असा मानस उराशी बाळगून मुस्लिम समाजाचे वयोवृद्ध महिला, तरुण मंडळी आपल्या पत्नी मुलासह सहपरिवार असे १५ जण आपल्या मुलाबाळासह संपूर्ण कुटुंबाला घेऊन तामसा येथून नुकतेच मक्का 'हज' यात्रेसाठी रवाना झाले आहेत. यात्रेत मुक्रम पठाण, सुलतान पठाण, उबेद पठाण व सलमान पठाण यांचेसह त्यांचा परिवाराचा समावेश आहे. त्यांच्या रवानगी निमित्ताने व हज यात्रा सुखकर होण्याच्या उद्देशाने सर्व धर्मियांनी त्यांचे तामसा नवीन बस स्थानकावर त्यांचे मोठे स्वागत केले. यावेळी प्रतिष्ठित भुसार व्यापारी अक्रम पठाण, शेख रसूल, पत्रकार संजय राऊलवार, अर्जुन जोशी, अरविंद हुंडेकर, गजानन जिद्देवार, रिजवान पठाण, अरिन पठाण, आदिल पठाण, नाझीम खान पठाण, नावेद खान पठाण यांचेसह मोठ्या संख्येने नातेवाईक, मित्रपरिवार, प्रतिष्ठित व्यापारी व नागरिकांनी त्यांना यात्रेसाठी निरोप दिला.



बीड - आदिशक्ती मुक्ताबाई पालखी सोहळ्याचे बीड शहरात आगमन झाले असता भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे यांनी मनोभावे दर्शन घेत आशीर्वाद घेतले.यावेळी वारकरी, भाविक भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी आणि बी.एस्सी. अँग्री अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी

## सौ.के.एस.के. काकू फूड टेक आणि कृषि महाविद्यालयाशी तात्काळ संपर्क करा

बीड /प्रतिनिधी

१२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र आणि कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दि.१० जुलै २०२६ पासून सुरू असून अंतिम दि. २५ जुलै २०२६ आहे. सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ऑनर्स. अँग्री) पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्न असलेल्या अ दर्जा प्राप्त सौ.के.एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी त्वरित यावे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी (चक्ढ-उएढ) परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. (गएए छएएढ) दिलेल्या आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांनी सागर हाईट्स, बस स्टॅन्ड समोर, बीड येथे यावे, याठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा विनामुल्य (मोफत) उपलब्ध आहेत.

तरी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेवून प्रवेशासाठी त्वरित संपर्क साधावा आणि प्रवेश घ्यावा, असे महाविद्यालयातर्फे आवाहन करण्यात येत आहे. संपर्कासाठी फोन नं.: ९४२००२५०५२ / ९४६३४३४५०४/९९७०८४२०१४/७५८८०८२०३४



अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार संघटनेच्या महाराष्ट्र परिषद आणि केंद्रिय कार्यकारिणी सभेचे ईलेक्ट्रिक रिमोटची कळ दाबून उद्घाटन करतांना महामहीम राज्यपाल मा.श्री.हरीभाऊ बागडे. सोबत अपारंपारिक उर्जामंत्री मा.ना.श्री.अतुल सावे, कें.अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे, सरचिटणीस हाजी सय्यद जहीरोद्दीन,सल्लागार आर.पी.थोरात, ताराचंद कोल्हे मामा.

# आमदार श्री शाळा उपक्रमाची घोषणा;आष्टी-पाटोदा-शिरूर मधील जिल्हा परिषद शाळा रोल मॉडेल बनविणार-आ.सुरेश धस

## मिशन निपुण बीड साठी शिक्षकांनी जागतिक दर्जाच्या शाळांचा संकल्प करावा - राष्ट्रपती पुरस्कार विजेते दत्तात्रय वारे

शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे हाच कार्यशाळेचा मुख्य उद्देश - मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद बीडचा शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मिशन निपुण बीड संकल्प कार्यशाळेत जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावणे, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मजबूत करणे आणि सरकारी शाळांना जागतिक दर्जाच्या बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेत आ. सुरेश (आण्णा) धस, राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे आणि बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी आ. सुरेश धस यांनी आमदार श्री शाळा या अभिनव उपक्रमाची घोषणा करत शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात मतदारसंघातील उत्कृष्ट कार्य करणारे शिक्षक, ग्रामस्थ आणि सरपंच यांच्या सहकार्याने निवडक जिल्हा परिषद शाळा दत्तक घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यात येणार असून त्या शाळा रोल मॉडेल म्हणून विकसित केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके आणि संदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष समिती स्थापन करून शाळांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यात येईल.

कोणत्याही पालकाला आपल्या पाल्याला खाजगी शाळेत पाठविण्याची गरज भासू नये, यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण वातावरण आणि अतिरिक्त शिक्षकांची पदे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही आमदार धस यांनी दिली.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले




की, मिशन निपुण बीड या कार्यशाळेचा मुख्य उद्देश शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे हा आहे. आ. सुरेश धस यांचे दर्जेदार शिक्षणावर विशेष लक्ष असून, आता जिल्हा, तालुका आणि केंद्र स्तरावर नियमित कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर दिला जाणार आहे. शिक्षकांनी प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडवावे, प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की, सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांचे खाजगी शाळांकडे होणारे स्थलांतर थांबून आता रिव्हर्स मायग्रेशन घडले पाहिजे. पालकांना इंग्रजी बोलणारी, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणारी मुले अपेक्षित आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने शिक्षणाची गुणवत्ता वाढवून शंभर टक्के विद्यार्थी साक्षर करण्याचा संकल्प करावा.

विद्यार्थ्यांना समजून घेणे, विषय मित्र संकल्पना प्रभावीपणे राबविणे, विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना व निरोगी स्पर्धा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारी शाळाही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होऊ शकतात, असे ठामपणे सांगत त्यांनी शिक्षकांना समाजात कायम स्मरणात राहील असे कार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या गावाला जगाच्या नकाशावर नेण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे गावातील शाळाच असल्याचे त्यांनी सांगितले.

वाबळेवाडी शाळेच्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून देताना दत्तात्रय वारे यांनी आ. सुरेश धस यांनी दिलेल्या सहकार्याचा विशेष उल्लेख केला. आष्टी-पाटोदा-शिरूर मधील शिक्षक भाग्यवान आहेत. त्यांच्या पाठीशी सह्याद्रीसारखा नेता उभा आहे, असे गौरवोद्गार काढत प्रत्येक शिक्षकाने मी माझी शाळा जागतिक दर्जाची घडवीन असा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेच्या शेवटी उपस्थित सर्व शिक्षकांनी मिशन निपुण बीड यशस्वी करण्याचा तसेच प्रत्येक जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण, आधुनिक आणि जागतिक दर्जाची बनविण्याचा सामूहिक संकल्प केला.या कार्यशाळेस बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल मुरकुटे, शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री चव्हाण, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. भागीरथी गिरी, उपशिक्षणाधिकारी मारुती जाधव, तिन्ही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके, संदीप पवार, नितीन करडुळे, सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, उपक्रमशील शिक्षक, विषयतज्ज्ञ शिक्षक तसेच शिक्षण विभागातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले, तर अण्णासाहेब घोडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बीड जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल

# ६ पोलीसनिरीक्षकांच्या बदल्या,केज येथे राहुल सूर्यतळ तर स्वप्नील उनवणे बीडला

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी,चोख ठेवण्याच्या उद्देशाने आणि प्रशासकीय गरजेनुसार बीड जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश२०१५ मधील कलम २२ (जे-१) नुसार,जिल्हास्तरीय पोलीस आस्थापना मंडळाने जिल्ह्यातील ६ पोलीसनिरीक्षकांच्या (झख) अंतर्गत बदल्यांना मंजुरी दिली आहे.या महत्त्वपूर्ण फेरबदलात केज पोलीस ठाण्याचे प्रभारी स्वप्नील उनवणे यांची विनंतीवरून बीड येथे बदली झाली असून,त्यांच्या जागी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी राहुल सूर्यतळ यांची केजचे नवे प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांची यादी व नवीन नियुक्ती जिल्हा पोलीस दलाने जारी केलेल्याअधिकृत आदेशानुसार,पोलीस निरीक्षकांच्याबदल्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे. स्वप्नील



उनवणे प्रभारी, पोलीस ठाणे केज प्रभारी,आगुशा शाखा, बीड (विनंती वरून) राहुल कामाजी सूर्यतळ प्रभारी,पोलीस ठाणे माजलगाव शहर प्रभारी,पोलीस ठाणे केज,प्रवीणकुमार युवराज बांगर प्रभारी, पोलीस नियंत्रण कक्ष, बीड प्रभारी,पोलीस ठाणे माजलगाव शहर निलेश एकनाथराव केळे प्रभारी,सायबर पोलीस ठाणे,बीड प्रभारी,पोलीस ठाणे पेठ बीड,अशोक काशिनाथ मुदिराज प्रभारी,पोडशाखा (मु.),बीड प्रभारी, सायबर पोलीस ठाणे, बीड,संतोष शंकर शेजाळ प्रभारी,आगार शाखा,बीड प्रभारी, पोडशाखा (मु.),बीड तातडीने पदभार स्वीकारण्याचे आदेश जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाने सर्व प्रशासकीय बाबींचा सखोल विचार करून या बदल्यांना मंजुरी दिली आहे. आदेशात नमूद केलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आपल्या जुन्या पदाचा कार्यभार सोपवून नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याचे आणि आपल्या पदाचा कार्यभारस्वीकारण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत.

कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होणार

पोलीस दलातील या मोठ्या फेरबदलांमुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल,तसेच पोलीस प्रशासनाची कार्यक्षमता आणि गतिशीलता वाढेल, अशी अपेक्षा पोलीस वर्तुळातून आणि नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

# धारूर-भायजळी-जहांगिरमोहा घाट रस्त्याची दुरवस्था

वाहनचालकांचा जीव धोक्यात

प्रतिनिधी । धारूर

धारूर-भायजळी-जहांगिरमोहा या घाट रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ठिकठिकाणी डांबरीकरण उखडून मोठमोठे खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी खडी उघडी पडल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करत प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्याची अवस्था बिकट झाल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

हा घाट रस्ता असल्याने दररोज दुचाकी, चारचाकी, शालेय वाहने तसेच शेतकऱ्यांची कृषी वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र रस्त्यावर खड्डे, उखडलेला डांबराचा थर आणि सैल खडी यामुळे वाहनांचे संतुलन बिघडण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः वळणाच्या ठिकाणी वाहन चालवताना चालकांना मोठी अडचण झाली आहे . वाहनचालक आणि नागरिकांनी या घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजविणे, नव्याने



डांबरीकरण करणे आणि आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.मुख्यमंत्री सडक योजनेकडे हा रस्ता असून या विभागाने विभागाने या रस्त्याकडे लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे .

धारूर -भायजळी -जहागीरमोहा रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे .आम्हाला रोज दूध उत्पादकांना धारूर येथे दूध घेऊन जावे लागते , परंतु दुचाकी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे . अनेक वेळा अपघात झाले आहे याकडे संबंधित विभागाचे नेहमी दुर्लक्ष होताना दिसत आहे

# शिरूर तालुक्यातील 'तो' बालविवाह दाबण्याचा प्रयत्न

## अल्पवयीन मुलीच्या आईची ग्रामीण विकास केंद्राकडे मदतीसाठी धाव

मानूर /प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील एका गावात महिनाभरापूर्वी झालेला बालविवाह स्थानिक प्रशासनाकडून दाबण्यात आल्याचा प्रकार घडला असून अल्पवयीन मुलीच्या आईनेच या संदर्भात ग्रामीण विकास केंद्र या बालविवाह विरोधी काम करणाऱ्या संस्थेकडे कारवाई करण्यासाठी धाव घेतली आहे.या संदर्भात अधिक माहिती अशी की,११ जून रोजी शिरूर तालुक्यातील एका गावात १५ वर्ष वय असलेल्या मुलीचा बालविवाह गावातीलच २८ वर्षीय तरुणासोबत लावण्यात आला होता.त्याबाबत मुलीच्या आईने शिरूर पोलिस स्टेशनसह बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे तक्रार देण्यासाठी धाव घेतली.परंतु पोलिसांनी सदरील काम आमचे नाही असे म्हणत महिलेला बालविकास कार्यालयाकडे पाठवून दिले.त्यानंतर सदरील महिला संबंधित कार्यालयाकडे गेली आणि लेखी तक्रार अर्ज दिला.त्यावर कार्यालयाने लग्न झाल्यावर आमच्याकडे अर्ज देऊन काही उपयोग नाही असे सांगितले.मुलाकडील नातेवाईक शेवगाव तालुक्यातील असल्याने तुमची तक्रार शेवगावला दाखल करण्यास सांगितले म्हणून सदरील महिला आणि तिच्या नातेवाईकांनी शेवगाव पोलीस स्टेशनला दोन चकरा मारल्या.तेंव्हा तेथील पोलिसांनी आम्ही कोणाचेही अर्ज घेत नाही.तुम्ही तुमच्या तालुक्यात जाऊन तक्रार करा.आम्हाला काय हेच काम नाही असे म्हणून अपमानास्पद वागणूक दिली.शेवटी सदरील महिलेने जिल्हाधिकारी,पोलिस अधीक्षक,चाईल्ड लाइन,बीड यांच्याकडे तक्रार दाखल केली.त्यानंतर ग्रामसेवकाने पंचनामा केला.परंतु पंचनाम्यावेळी तक्रारदार महिलेला आणि बालविवाह झाल्याची माहिती असलेल्या लोकांना बोलावले नाही.म्हणून बालविवाह झाल्याची माहिती असतानाही आणि बालविवाहानंतर नवदाम्पत्य जेजुरीच्या खंडोबाला जाऊन आले आणि जागरण गोंधळ देखील केला.या बालविवाहाची आणि त्यानंतरच्या सर्व कार्यक्रमांची माहिती असतानाही स्थानिक ग्रामसेवकाने साखरपुडा झाला असल्याचा पंचनामा सादर करून प्रशासनाची दिशाभूल केली आहे.हा सर्व प्रकार ग्रामसेवक आणि बालविवाह घडवून आणणाऱ्या सर्व लोकांनी आपसात संगनमत करून दाबण्याचा प्रकार चालवला असल्याने तक्रारदार महिलेने ग्रामीण विकास केंद्राकडे सविस्तर तक्रार अर्ज देऊन या प्रकरणी कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करून मदत केल्याची मागणी केल्याने ग्रामीण विकास केंद्राचे बालहक्क कार्यकर्ते ड.समीर पठाण यांनी त्यांचे अहवालासह महिलेच्या तक्रारीनुसार प्राप्त पुरावे बालकल्याण समिती तथा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायपीठ,बीड यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केले असून बालकल्याण समिती या प्रकरणी काय कारवाई करते ? याकडे लक्ष लागले आहे.

# केज नगरपंचायत घरकुल घोटाळा, प्रशासकीय व कायदेशीर हालचालींना वेग

## तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांसह सहा जणांवर गुन्हे दाखल,चार जणांनी वीस लाख रुपये भरले

केज/प्रतिनिधी

केज नगर पंचायती मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेत (घरकुल योजना) झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी आता प्रशासकीय आणि कायदेशीर हालचालींना तीव्र वेग आला आहे.ज्यांच्या नावे धनादेशाद्वारे बेकायदेशीररीत्या रक्कम उचलण्यात आली होती,अशा ३१ जणांना नगरपंचायती मार्फत दोन वेळा कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.या कारवाईनंतर अखेर चौघांनी नगर पंचायतीच्या खात्यावर १९ लाख ९६ हजार सुमारे २० लाख रुपये भरणा




केल्याची अधिकृत माहिती मिळत आहे. दरम्यान,या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आली आहे.या प्रकरणातील आरोपींचा कसून शोध सुरू असल्याची माहिती राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी राज्य विधानसभेत दिली आहे.विधानसभेत आमदार विजयसिंह पंडित (गेवराई) आणि आमदार राजेश विटेकर (पाथरी) यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता,ज्यावर उत्तर देताना शासनाने ही माहिती दिली.

या चौघांनी जमा केली रक्कम

घरकुल घोटाळा प्रकरणी ज्या ३१ जणांच्या बँकखात्यांवर परस्पर रक्कम जमा करण्यात आली होती, त्यापैकी नगरपंचायती च्या नोटिशीनंतर खालील कंत्राटदार व संस्थांनी रक्कम परत जमा केली आहे.हरी ओम ट्रेडर्स (गायकवाड) -१४ लाख रुपये, पशुपतीनाथ दांगट (पेट्रोल पंप) ४ लाख रुपये,तनिष्का कन्स्ट्रक्शन -१ लाख रुपये,जनता इंजिनिअरिंग - ९६ हजार रुपये,

आरोपी अजूनही मोकाट

या प्रकरणाचा तपास करत असलेले आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आरोपींचा शोध सुरू असल्याचे सांगितले.नगर पंचायतीचे मुख्याधिकारी अजित डोपे यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी यापूर्वीच सहा जणांवर गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये तत्कालीन मुख्याधिकारी (सेवानिवृत्त) मिलिंद सावंत,तत्कालीन लेखापाल यांच्यासह अन्य संबंधितांचा समावेश आहे.मात्र, मुख्य आरोपी अद्याप मोकाट असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.